cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१७० | बुधवार दि.०९ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### डीजेचा दणदणाट आणि सरकारची दुटप्पी शांतता!

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि परंपरेचा उत्सव आहे. पण श्रद्धेच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचा उन्माद सुरू झाला आणि डीजेच्या दणदणाटाने रुग्ण, वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे जगणेच हैराण झाले, तर त्याला 'उत्सवाचा उत्साह' म्हणायचे की कायद्याची उघडपणे खिल्ली? हा प्रश्न आता महाराष्ट्राने सरकारला विचारण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीजेमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे मान्य केले आहे. पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री म्हणून ही भूमिका स्वागतार्ह आहे. पण सरकारचे काम केवळ आवाहन करण्यापुरते आहे का? कायदे असताना त्यांची अंमलबजावणी कोण करणार? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? प्रशासनाला आदेश देण्याची जबाबदारी कोणाची?

## थोडक्यात...

### गोंदियात भिषण अपघात, सहा ठार

गोंदिया: गोंदिया जिल्ह्यात सोमवारी रात्री झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला आहे. भरधाव ट्रकने समोरून येणाऱ्या एसयुव्ही कारला जोरदार धडक दिल्याने तीन वर्षांच्या चिमुकल्यासह सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले आहेत. मृत आणि जखमी झालेले सर्वजण मजूर असून ते मध्य प्रदेशातील बालाघाट येथून तेलंगणातील करीमनगर येथे कामासाठी जात होते. हा अपघात गोंदिया जिल्हा मुख्यालयापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या नागरा गावाजवळ झाला. समोरून येणाऱ्या कारला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. मात्र, या भीषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. यात तीन वर्षाच्या चिमुकल्याचास समावेश आहे.

### ११ सप्टेंबरला राज्यव्यापी कोचिंग क्लासेस बंद!

पुणे: 'महाराष्ट्र खासगी कोचिंग केंद्रे नोंदणी व नियमन कायद्या'चा मसुदा अंतिम करण्यापूर्वी राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशानुसार तातडीने संवाद साधावा, अशी मागणी प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने (पीटीएएम) केली आहे. एप्रिल २०२५ मध्ये दाखल रिट पिटिशनवर न्यायालयाने सरकारला याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. सरकारने या आदेशाचे पालन न केल्यास आणि मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ११ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकदिवसीय कोचिंग क्लासेस बंद पाळण्याचा इशारा पीटीएएमने पत्रकार परिषदेत दिला आहे. पीटीएएमचे अध्यक्ष डॉ.प्रशांत कुलकर्णी यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत संघटनेची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, संघटनेचा योग्य, संतुलित आणि पारदर्शक नियमनाला पाठिंबा आहे; मात्र कोचिंग संस्थांवर अवाजवी अनुपालनाचा बोजा टाकणाऱ्या तसेच मनमानी प्रशासकीय कारवाईला वाव देणाऱ्या तरतुदींना संघटनेचा विरोध आहे.

### सीजेपीने राजकारणात जाऊ नये-सोनम वांगचूक

लेह: कॉक्रोच जनता पार्टी अर्थात सीजेपीने एक तटस्थ दबावगट म्हणून काम करावे; मात्र त्यांनी राजकीय पक्ष स्थापन करु नये. देशातील अराजकतेविषयी सीजेपीने सर्व राजकीय पक्षांना जबाबदार धरावे, असे प्रतिपादन लडाखमधील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, नवोपक्रमशील आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी केले आहे. लेह ॲपेक्स बॉडी आणि केंद्रीय गृह मंत्रालय यांच्यात ९ सप्टेंबरला होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, वांगचुक यांनी लडाखच्या राजकीय आकांक्षा, घटनात्मक संरक्षण आणि हिमालयीन क्षेत्रासमोरील वाढती पर्यावरणीय आव्हाने यांवरही चर्चा केली. वांगचूक म्हणाले की, कोणत्याही एका बाजूची निवड न करता सीजेपीने दबावगट म्हणून काम करणे शक्य आहे. माझ्या मते, सीजेपीची भूमिका हीच आहे आणि ती अशीच पुढे चालू राहील. जर एखाद्या व्यक्तीने पक्षात सामील होण्याचा किंवा स्वतःचा पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला, तर त्यात काहीच गैर नाही; कारण शेवटी आपल्याला नेत्यांची गरज असतेच. तरीही, त्यांनी आतापर्यंत जे व्यासपीठ निर्माण केले आहे ते कौतुकास्पदरीत्या तटस्थ आणि राजकीयदृष्ट्या निष्कलंक आहे, आणि ही एक चांगली रणनीती आहे असे मला वाटते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०८ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५१.५० क्विंटल | २,६५१ | ३,००० | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड: ४९.०० क्विंटल | २,६५० | ५,६२३ | ३,५२९ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर: १.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद: १.५० क्विंटल | ८,३७० | ८,३७० | ८,३७० |
| बाजरी: ११४.०० क्विंटल | २,६२० | ३,१२१ | २,७९८ |
| मुग: ७.०० क्विंटल | ८,२१० | ९,५११ | ९,१४४ |
| सोयाबीन: २९.५० क्विंटल | ६,०११ | ६,०११ | ६,०११ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१५० | ६,०७६ |

# कांद्याचे दर वाढले; शेतकऱ्यांच्या पदरात मात्र काहीच नाही!

## बहुतांश शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक नसल्याने दरवाढीचा फायदा व्यापारी आणि साठेबाजांना; सरकारकडून ग्राहकांना ३५ रुपयांत कांदा

नवी दिल्ली । वृतसंस्था

**कांद्याच्या दरात सध्या वाढ होत असल्याचे चित्र बाजारात पाहायला मिळत आहे. मात्र, या दरवाढीचा प्रत्यक्ष फायदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कितपत मिळत आहे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. देशातील बहुतांश शेतकऱ्यांकडे जुना कांदा शिल्लक नसल्याने वाढलेल्या बाजारभावाचा लाभ मोजक्याच शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे बाजारात कांदा महागला असला तरी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात त्याच प्रमाणात वाढ झालेली नाही.**

कांद्याच्या वाढत्या दरामुळे ग्राहकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने आपल्या बफर स्टॉकमधील कांदा बाजारात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने आतापर्यंत १७ शहरांमध्ये सुमारे ४ हजार टन कांद्याची विक्री केली असून, निवडक शहरांमध्ये ग्राहकांना ३५ रुपये प्रति किलो या सवलतीच्या दरात कांदा



उपलब्ध करून दिला जात आहे. कांद्याच्या किरकोळ दरात वाढ होत असताना सरकारने बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी बफर स्टॉकचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे ▶▶ पान २ वर

### खरीप कांदा आल्यानंतर दर कमी होणार

सरकारच्या म्हणण्यानुसार, नवीन खरीप कांद्याची आवक सुरू झाल्यानंतर आगामी काळात कांद्याच्या दरात आणखी दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, दर कमी झाल्यास त्याचा फटका पुन्हा शेतकऱ्यांनाच बसण्याची शक्यता आहे. कारण नवीन पीक बाजारात येण्याच्या काळात दर घसरल्यास उत्पादन खर्च, मजुरी आणि वाहतूक खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळणे कठीण होऊ शकते. त्यामुळे कांदा महागला म्हणून ग्राहकांच्या हितासाठी सरकारी हस्तक्षेप आणि कांदा स्वस्त झाला की शेतकऱ्यांच्या हितासाठी उपाययोजना, अशी दोन्ही बाजूंनी संतुलित धोरणाची गरज आहे.

# जरांगेंनी संयमाने बोलावे; नेत्यांवर टीका केल्यास रस्त्यावर उतरू

## सामंत, सरनाईक, गोगावले यांचा इशारा; मराठा आरक्षणाच्या मागणीवर जरांगे ठाम

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण मंगळवारी अकराव्या दिवशीही सुरू आहे. सरकारने जरांगे यांच्या १२ मागण्या मान्य केल्याचा दावा मंत्री उदय सामंत यांनी केला असून, त्यांनी उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले आहे. मात्र, जरांगे पाटील आपल्या सर्व मागण्यांवर ठाम असून १२ सप्टेंबरला बैठक घेऊन मुंबईकडे कूच करण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर आता सत्ताधारी नेत्यांकडूनही जरांगे यांच्या भूमिकेवर**



**तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.**

मंत्री उदय सामंत यांनी, ज्यांनी मराठा समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न केले, त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही, असे सांगत जरांगे यांनी संयमाने बोलावे, असे आवाहन केले. सरकारने त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून आंदोलन मागे घेण्याची गरज असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मंत्री प्रताप सरनाईक यांनीही जरांगे पाटील यांना इशारा दिला आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून मराठा समाजासाठी जे निर्णय घेतले, तेवढे कोणत्याही नेत्याने केले नव्हते. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मराठा समाजासाठी मोठ्या प्रमाणात काम केले आहे, असा दावा सरनाईक यांनी केला. ''कोणाच्या तोंडातले काढून देण्याची मागणी मान्य होणार नाही. आम्ही तुम्हाला ▶▶ पान २ वर

# मराठवाड्यावर दुष्काळाची छाया; संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन उपाययोजना करा

## धनंजय मुंडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे येत्या १७ सप्टेंबर रोजी किंवा तत्सम कालावधीत लवकरात लवकर मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करून दुष्काळजन्य परिस्थितीवर उपाययोजना व शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व माजी




मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यंदाच्या खरीप ▶▶ पान २ वर

# संतोष पंडित यांची येरवडा कारागृहात रवानगी




पुणे । प्रतिनिधी

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि एका महिला नगरसेविकेबाबत समाजमाध्यमात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी रीलस्टार संतोष गजानन पंडित याची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. पंडित याच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने मंगळवारी शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डॉ. जी. आर. डोरनलपल्ले यांनी त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली.

सरकार पक्षातर्फे युक्तिवाद करताना ॲड. योगेश कदम म्हणाले की, आरोपीने केलेला गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आणि महिलांविषयी आहे. तो रेकॉर्डवरील आरोपी असून, त्याविरोधात यापुर्वी महिला विनयभंगाचे चार गुन्हे दाखल आहेत. पर्वती पोलिस ठाण्यात दोन आणि डेक्कन तसेच विश्रामबाग पोलिस ठाण्यात प्रत्येकी ▶▶ पान २ वर

# एका समाजाच्या वाट्यातील हिस्सा काढून दुसऱ्याला देणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांची मराठा आरक्षणावर स्पष्ट भूमिका

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाचा मंगळवारी ११ वा दिवस होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना, ''संविधानाच्या चौकटीत जे काही शक्य आहे ते मराठा समाजाला देऊ; मात्र एका समाजाच्या वाट्यातील हिस्सा काढून दुसऱ्या समाजाला देणार नाही,'' असे स्पष्ट केले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने



घेतलेल्या बैठकीबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना फडणवीस यांनी ही भूमिका मांडली. महायुती सरकारने आतापर्यंत मराठा समाजाशी संबंधित अनेक महत्त्वाचे ▶▶ पान २ वर

# मुंबईत गांधी यांच्याविरोधात मानहानीचा खटला चालणार



मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात केलेल्या कथित वक्तव्याप्रकरणी दाखल झालेला मानहानीचा खटला रद्द करण्याची लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.८) फेटाळून लावली. उच्च न्यायालयाच्या ▶▶ पान २ वर

# ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीऐवजी गुजरातमध्ये

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत स्टॅच्यू ऑफ युनिटीसमोर रंगणार कार्यक्रम

दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ७२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आतापर्यंत नेहमी देशाची राजधानी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित केला जाणारा हा भव्य सोहळा यंदा दिल्लीबाहेर आयोजित केला जाणार आहे. गुजरातमधील केवडिया (सध्याचे नाव एकता नगर) येथील जगातील सर्वात उंच स्टॅच्यू ऑफ युनिटी समोर हा ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. येत्या २२ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या ▶▶ पान २ वर





# राज्यात शुक्रवारपासून पाऊस?

## हवामान विभागाचा अंदाज; शेतकऱ्यांना दिलासा मिळणार

पुणे । प्रतिनिधी

**पावसाची प्रतिक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना आठवड्याच्या शेवटी दिलासा मिळण्याची शक्यता आहे. कारण शुक्रवारपासून विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात पावसाला सुरुवात होऊ शकते, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.**

मध्य उत्तर प्रदेश आणि परिसरावर तयार झालेल्या कमी दाब क्षेत्राची तीव्रता कमी झाली आहे. त्याला लागून समुद्र सपाटीपासून ३.१ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्याची



स्थिती कायम आहे. तसेच, मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा पंजाबमधील फिरोजपूर, उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर आणि बस्ती तसेच बिहारमधील देहरी आणि पश्चिम बंगालमधील दिघा ते ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत कायम आहे. त्याचबरोबर दक्षिण गुजरात ते पूर्व उत्तर प्रदेश आणि शेजारच्या मध्य प्रदेशातील काही भागात कमी दाबाचा पट्टा कायम आहे. राज्यात शुक्रवारपासून काही भागात पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातील बहुतांशी भागात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. गुरुवारीही काही भागात ढगाळ हवामानासह हलक्या सरी पडतील, अशी शक्यता हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. परंतू पुढील दोन दिवस राज्यात जोरदार पावसाला पोषक हवामान नसल्याचे हवामानशास्त्र ▶▶ पान २ वर

# मराठा आरक्षणासाठी लातूरमध्ये आत्महत्या

लातूर । प्रतिनिधी



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात पेटलेला वणवा अधिकच तीव्र झाला असून, लातूर जिल्ह्यातून एक अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. ''मी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी माझे जीवन संपवत आहे,'' अशी चिठ्ठी लिहून शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सुमठाणा येथील सुनील विनायक बिरादार (वय ४२) या मराठा बांधवाने पाण्याने तुडुंब भरलेल्या विहिरीत उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट पसरली असून, संतप्त गावकरी आणि नातेवाईकांनी उदगीर-लातूर मुख्य रस्त्यावर ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सत्तेची घाई, संविधानाची पायमल्ली!

### न्यायालयीन स्वायत्ततेचा संकोच, संघराज्य व्यवस्थेवर आघात आणि प्रशासकीय सत्तेचा गैरवापर; केंद्राच्या दुटप्पी कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

लोकशाहीमध्ये सत्ता मोठी नसते; संविधान मोठे असते. सरकार कितीही बहुमताचे असो, त्याच्या अधिकारांना संविधानाने आखून दिलेल्या मर्यादा असतात. परंतु केंद्रातील सत्तेची अलीकडची कार्यपद्धती पाहिली तर एक धोकादायक प्रश्न समोर येतोसत्ता संविधानाच्या चौकटीत चालते आहे की संविधानालाच सत्तेच्या सोयीने वाकवले जात आहे? पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी न्यायमूर्ती अश्वनीकुमार मिश्रा यांच्या नियुक्तीवरून निर्माण झालेला वाद या प्रश्नाला अधिक धार देतो. पंजाब सरकारचे म्हणणे होते की, नियुक्तीपूर्वी राज्याचे मत विचारात घेण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नव्हती. केंद्राने १२ ऑगस्टला पत्र पाठवले; मात्र राज्याला आपली भूमिका मांडण्याची पुरेशी संधी मिळण्याआधीच ५ सप्टेंबरला नियुक्तीची अधिसूचना काढण्यात आली, असा पंजाबचा आक्षेप आहे. येथे मुद्दा केवळ एका न्यायमूर्तींच्या नियुक्तीचा नाही. मुद्दा आहे तो संघराज्य व्यवस्थेतील परस्पर सन्मानाचा. राज्य सरकारला विचारायचे, त्याचे म्हणणे ऐकायचे आणि नंतर निर्णय घ्यायचा, ही जर घटनात्मक प्रक्रियेची अपेक्षा असेल, तर ती केवळ कागदावरील औपचारिकता ठरवता येणार नाही. याहून गंभीर प्रश्न म्हणजे निकष समान आहेत का?

भाजपशासित राज्याच्या बाबतीत निर्णयासाठी प्रतीक्षा केली जाते आणि बिगर-भाजप सरकारच्या बाबतीत घाई केली जाते, असा संशय निर्माण होत असेल तर केंद्राने त्याचे निरसन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. लोकशाहीत संशयही धोकादायक असतो आणि दुटप्पीपणाची भावना तर त्याहून धोकादायक. न्यायपालिकेच्या बाबतीत केंद्राने विशेष सावध असणे अपेक्षित आहे. कारण न्यायालये ही सरकारची उपकंपनी नाहीत. ती सत्तेवर नियंत्रण ठेवणारी घटनात्मक यंत्रणा आहेत. न्यायालयीन स्वायत्ततेचा प्रश्न निर्माण झाला की त्याचा परिणाम एखाद्या पक्षावर नव्हे, तर नागरिकाच्या मूलभूत अधिकारांवर होतो आणि याच संदर्भात उत्तर प्रदेशातील आकृती चौधरी प्रकरण अधिक भयावह चित्र दाखवते. अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोएडा येथील विद्यार्थिनी आकृती चौधरीवर लावण्यात आलेली राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत नजरकैद रद्द करताना प्रशासन आणि पोलिसांच्या कार्यपद्धतीवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, नजरकैदेचा आदेश पुरेशा सामग्रीशिवाय आणि विचार न करता काढण्यात आला होता. न्यायालयाने तिच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्याचे नमूद केले. या प्रकरणात न्यायालयाने प्रशासनाला दिलेला संदेश अत्यंत स्पष्ट आहे. अधिकारी हे राजकीय सत्तेचे नोकर नसून, संविधानाचे सेवक आहेत. न्यायालयाने तर अधिकाऱ्यांची निष्ठा राजकीय कार्यकारीपेक्षा संविधानाशी असली पाहिजे, असे ठणकावले. यापेक्षा गंभीर इशारा कोणता असू शकतो? न्यायालयाने उत्तर प्रदेश प्रशासनाच्या अशा 'हुकूमशाही' प्रवृत्तीला लगाम न घातल्यास राज्याचे रूपांतर 'ऑर्वेलियन डिस्टोपिया' मध्ये होऊ शकते, अशी तीव्र टिप्पणी केली. हा केवळ उत्तर प्रदेश सरकारला दिलेला इशारा नाही; तो संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे.

राष्ट्रीय सुरक्षा कायदा हा नागरिकांच्या तोंडावर कुलूप लावण्यासाठी तयार केलेला कायदा नाही. तो असाधारण परिस्थितीसाठी असलेले असाधारण शस्त्र आहे. शांततापूर्ण आंदोलन, सरकारविरोधी मत किंवा सार्वजनिक ठिकाणी व्यक्त केलेला असंतोष यांना 'राष्ट्रीय सुरक्षा'च्या चौकटीत ढकलणे सुरू झाले तर उद्या कोणताही नागरिक सुरक्षित राहणार नाही. आकृती चौधरी प्रकरणात न्यायालयाला पोलिसांच्या कथनातील विसंगतीही आढळली. तसेच तिच्याकडील संदेश आणि व्हिडिओमध्ये हिंसाचाराला चिथावणी दिल्याचे ठोस साहित्य राज्य दाखवू शकले नाही, असे न्यायालयाच्या आदेशात नमूद झाले. मग प्रश्न असा की, आंदोलन करणारा नागरिक शत्रू कधीपासून झाला? सरकारवर टीका करणारा नागरिक देशद्रोही नाही. आंदोलन करणारा नागरिक अराजकतावादी नाही. प्रश्न विचारणारा नागरिक 'धोकादायक' नाही. लोकशाहीचे सौंदर्यच हे आहे की नागरिक सरकारला जाब विचारू शकतो. पण जर प्रशासनाने प्रत्येक असहमतीकडे गुन्हा म्हणून पाहण्यास सुरुवात केली, तर लोकशाहीचा आत्माच गुदमरतो. न्यायालयाने या प्रकरणात पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश देताना ती संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करण्याचे निर्देश दिले. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांच्या सेवा अभिलेखात न्यायालयाची नाराजी नोंदवण्यास सांगितले. हा निर्णय केवळ एका विद्यार्थिनीला मिळालेला दिलासा नाही. तो अधिकारीशाहीला संविधानाची आठवण करून देणारा आरसा आहे. आज प्रश्न केंद्राचा असो किंवा राज्याचा, सत्तेचा रंग कोणताही असो, तत्त्व एकच असले पाहिजे. भाजपचे सरकार असो, काँग्रेसचे असो किंवा अन्य कोणत्याही पक्षाचे; संविधानापेक्षा कोणीही मोठे नाही. केंद्राने राज्यांना राजकीय विरोधक म्हणून पाहणे थांबवले पाहिजे. राज्य सरकारांशी मतभेद असतील तर ते राजकीय मैदानात लढावेत. घटनात्मक संस्थांचा वापर करून राज्यांना नमवण्याचा प्रयत्न झाला तर संघराज्य व्यवस्था केवळ नावापुरती उरेल. तसेच प्रशासनानेही लक्षात ठेवले पाहिजे. मुख्यमंत्र्यांचे आदेश आणि राजकीय दबाव यापेक्षा संविधानाची शपथ मोठी आहे.

आज एखाद्या आंदोलकावर कायद्याचा गैरवापर झाला आणि उद्या त्याच कायद्याचा फटका आपल्या घरातील एखाद्या नागरिकाला बसला, तर मग उशिरा केलेला निषेध निरर्थक ठरेल. म्हणूनच प्रश्न पंजाबपुरता नाही. प्रश्न उत्तर प्रदेशपुरताही नाही. प्रश्न आहे, भारतीय लोकशाहीत सत्ता संविधानाला उत्तरदायी राहणार की संविधान सत्तेच्या सोयीचे साधन बनणार? केंद्राची घाई, राज्यांच्या अधिकारांकडे दुर्लक्ष आणि प्रशासनाच्या हातातील कठोर कायद्यांचा संभाव्य गैरवापर या तीनही गोष्टी एकत्र आल्या तर लोकशाहीसाठी परिस्थिती निश्चितच चिंताजनक आहे. सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवावे, बहुमत निवडणुकीत मिळते; निरंकुशतेचा परवाना मिळत नाही आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांचा अर्थ मनमानी करण्याचा अधिकार नव्हे, तर जबाबदारीने राज्य करण्याची शपथ आहे. न्यायालये ही त्या शपथेची राखण करणारी शेवटची भिंत आहेत. ती भिंत कमकुवत करण्याऐवजी अधिक मजबूत करणे, हाच लोकशाही वाचवण्याचा एकमेव मार्ग आहे.

---

# मोरगाव तलावातून अवैध पाणी उपसा; मोटारी, स्टार्टर जप्त

### पावसाने ओढ दिल्याने प्रशासन सतर्क; अनधिकृत उपसा केल्यास कठोर कारवाईचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**पावसाचे कमी व अनियमित प्रमाण लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठा जपण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार बीड तालुक्यातील मोरगाव-वाणगाव हद्दीतील लघुप्रकल्पातून सुरू असलेला अवैध पाणी उपसा मंगळवारी (दि. ८) थांबविण्यात आला. यावेळी पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत मोटारी व स्टार्टर जप्त करण्यात आले.**



या कारवाईत मंडळ अधिकारी सोनाली कदम, ग्रामपंचायत अधिकारी जगदीश कडु पाटील, ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी नारायण जाधव, अंकुश भड, सचिन गायकवाड व दत्तात्रय बनसोडकर सहभागी झाले. तलावातून पुन्हा अनधिकृत पाणी उपसा आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. कमी पावसामुळे आगामी काळातील पिण्याचे पाणी, जनावरांची गरज आणि शेतीसाठी आवश्यक पाण्याचा विचार करून उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जलसाठ्यांचा नियमित आढावा घेण्यावर भर दिला, तर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्थानिक यंत्रणांनी अनधिकृत पाणी उपशावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील जलसाठ्यांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. ''मोरगाव-वाणगावपुरती ही कारवाई मर्यादित राहणार नाही. इतर तलाव व लघुप्रकल्पांवरही पाहणी केली जाईल. अनधिकृत मोटारी अथवा पाईपलाईनद्वारे पाणी उपसा आढळल्यास कारवाई केली जाईल. प्रत्येक थेंब जपा आणि प्रशासनाला सहकार्य करा,'' असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केले.

---

# तुमचे शरीरच तुमचे खरे जीवनसाथी-डॉ. टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**आई-वडील, पती-पत्नी, मुलं किंवा मित्र हे जीवनातील महत्त्वाचे साथीदार असले तरी जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक क्षणी सोबत असणारे शरीरच आपले खरे जीवनसाथी आहे, असे मत एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ज्ञ, न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ व सेक्सोलॉजिस्ट डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे यांनी व्यक्त केले.**



आपण आपल्या शरीराची जितकी काळजी घेऊ, तितके शरीरही आपली साथ देईल. आहार, व्यायाम, तणावाचे व्यवस्थापन आणि पुरेशी विश्रांती यांचा आरोग्यावर मोठा परिणाम होतो. त्यामुळे ''तुमचे शरीर हाच तुमचा कायमचा पत्ता आहे,'' हे लक्षात घेऊन प्रत्येकाने आरोग्याला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. फुफ्फुसांसाठी प्राणायाम, मनासाठी ध्यान व चांगले विचार, शरीरासाठी योग, हृदयासाठी नियमित चालणे, आतड्यांसाठी सकस आहार आणि निरोगी जीवनासाठी चांगले कर्म आवश्यक असल्याचेही डॉ. टेकाळे यांनी नमूद केले. डॉ. जगदीश टेकाळे हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरातील साई (गावते कॉम्प्लेक्स), डी.पी. रोड, डॉक्टर लाईन, बसस्थानकाच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.


---

# शहागडचे भूमिपुत्र महेश चोथे पिंपरी- चिंचवडचे आरटीओ

### आई-वडिलांच्या संस्कारातून मिळाले यश-महेश चोथे

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील शहागड गावचे भूमिपुत्र महेश चोथे यांची सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (सहाय्यक आरटीओ) म्हणून निवड झाली असून, त्यांनी पिंपरी-चिंचवड येथे आपल्या पदावर ड्युटीवर रुजू होत जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांच्या या यशामुळे शहागड गावासह संपूर्ण अंबड तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.**



महेश चोथे हे लहानपणापासूनच हुशार, अभ्यासू, मेहनती आणि जिद्दी स्वभावाचे असून, शिक्षणाच्या काळापासूनच त्यांनी आपल्या ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न केले. कठोर परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी सहाय्यक आरटीओ पदापर्यंत मजल मारली आहे. मुलाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आई-वडिलांनी आनंद व्यक्त करत मुलाचं कौतुक केले. आपल्या मुलाने मिळविलेल्या यशाचा अभिमान असल्याचे सांगताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आई-वडिलांचे संस्कार, प्रोत्साहन आणि महेश यांनी घेतलेली मेहनत यामुळेच हे यश मिळाले असल्याची भावना व्यक्त होत आहे. महेश चोथे यांच्या निवडीची बातमी समजताच शहागड गाव तसेच अंबड तालुक्यातील विविध क्षेत्रातील नागरिक, मित्रपरिवार, नातेवाईक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातून आलेल्या एका होतकरू युवकाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर प्रशासकीय क्षेत्रात मिळविलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. पिंपरी-चिंचवड येथे सहाय्यक आरटीओ म्हणून रुजू झाल्यानंतर चोथे महेश मिराबाई चंद्रकांत यांच्याकडून नागरिकांना उत्तम सेवा मिळावी आणि आपल्या कार्यातून शहागड गावाचे व अंबड तालुक्याचे नाव अधिक उंचवावे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. सर्व स्तरातून अभिनंदन महेश चोथे यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, नागरिक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्था, मित्रपरिवार आणि युवकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

---

## पान १ वरून...

### कांद्याचे दर वाढले; शेतकऱ्यांच्या

सध्या कांद्याचा बाजारभाव वाढला असला तरी त्याचा फायदा प्रत्यक्ष कांदा उत्पादकांच्या हातात जाण्याऐवजी ग्राहकांना दिलासा देण्यासाठी सरकारी यंत्रणा सक्रिय झाल्याचे चित्र आहे. सरकारी आकडेवारीनुसार, अनुदानित विक्री सुरू होण्यापूर्वी २८ ऑगस्ट रोजी कांद्याचा अखिल भारतीय सरासरी किरकोळ भाव ४८.५० रुपये प्रति किलो होता. त्यानंतर ५ सप्टेंबर रोजी हाच दर वाढून सुमारे ५०.७९ रुपये प्रति किलो झाला. म्हणजेच सरकारकडून बफर स्टॉकमधील कांदा बाजारात उतरवूनही किरकोळ दरात अपेक्षित घट झालेली नसल्याचे आकडेवारीवरून दिसते. केंद्र सरकारने २०२६ वर्षासाठी सुमारे १.२१ लाख टन कांद्याचा बफर स्टॉक तयार केला आहे. गरजेनुसार हा कांदा विविध राज्ये आणि शहरांमध्ये वितरित केला जात आहे. एनसीसीएफ आणि नाफेडच्या माध्यमातून बाजारात कांद्याचा पुरवठा केला जात आहे. कांदा उत्पादक राज्यांमधून मोठ्या शहरांमध्ये कांदा पोहोचवण्यासाठी ट्रकसोबतच 'कांदा एक्सप्रेस'सारख्या विशेष रेल्वेगाड्यांचाही वापर केला जात आहे. दिल्ली आणि चेन्नई येथे मोठ्या प्रमाणात कांदा पोहोचवण्यात आला असून, आता गुवाहाटीकडेही कांदा पाठवण्याची तयारी सुरू आहे. एनसीसीएफच्या माहितीनुसार, आतापर्यंत किरकोळ विक्रीच्या माध्यमातून सुमारे १५०० टन कांदा विकण्यात आला आहे. ज्या शहरांमध्ये कांद्याचे दर तुलनेने जास्त आहेत, त्या शहरांमध्ये बफर स्टॉकमधील कांदा ३५ रुपये किलो या दराने विकला जात आहे. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या स्थितीचा प्रश्न कायम आहे. दर वाढण्याची वेळ आली तेव्हा बहुतांश शेतकऱ्यांकडील कांदा बाजारात आलेला किंवा विकला गेलेला असतो. त्यामुळे बाजारातील वाढलेल्या दराचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळण्याऐवजी पुरवठा साखळीतील पुढील घटकांना होण्याची शक्यता अधिक असते. केवळ बाजारातील किरकोळ दर नियंत्रित करण्यापेक्षा शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळेल, अशी बाजारव्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

-------------

### मराठवाड्यावर दुष्काळाची छाया; संभाजीनगर

हंगामात पावसाने तीव्र ताण दिल्याने पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, खरीप हंगामात मराठवाड्यात सरासरीच्या ५० टक्केही पाऊस झालेला नाही. यामुळे पेरलेली सर्व खरीप पिके करपून गेली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्याचबरोबर विहिरी आणि तलावांतील जलस्रोत कोरडे पडल्याने येत्या काळात पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर रूप धारण करणार आहे, यावरही तातडीने उपाययोजना करणे व वेळीच योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय ध्वजारोहण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडणार आहे. याच औचित्यावर किंवा तत्सम वेळेत लवकरात लवकर छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन मराठवाड्यासाठी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशी विनंती मुंडे यांनी आपल्या पत्रात केली आहे. मराठवाड्यातील संकटाच्या काळात नेहमीच राज्य सरकारने पुढाकार घेऊन मदत केलेली आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे आधीही अनेकदा मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने मराठवाड्यात ही विशेष मंत्रिमंडळ बैठक आयोजित करून कोरडा दुष्काळ जाहीर करून सवलती देणे, खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई, रब्बी हंगामाचे नियोजन, तसेच पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याबाबत ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, असेही श्री मुंडे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. मराठवाड्याप्रमाणेच विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाअभावी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठवाड्यासह या भागांसाठीही स्वतंत्र मंत्रिमंडळ बैठका घेऊन तातडीने निर्णय घेण्यात यावेत, अशी विनंतीही धनंजय मुंडे यांनी पत्रात केली आहे.

----------

### जरांगेंनी संयमाने बोलावे; नेत्यांवर

साहेब म्हणून बोलतो; मात्र आमच्या नेत्यांबद्दल अपशब्द वापरले तर आम्हीही रस्त्यावर उतरू शकतो,'' असा इशारा सरनाईक यांनी दिला. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात एकेरी किंवा अपशब्दांची भाषा खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. मंत्री भरत गोगावले यांनीही सरकारने मराठा समाजासाठी केलेल्या कामांचा दाखला दिला. हैदराबाद गॅझेट, आरक्षण यांसारख्या मागण्यांबाबत चर्चा होऊ शकते; मात्र नेत्यांवर टीका केली तर कोणताही नेता ते सहन करणार नाही, असे गोगावले म्हणाले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजासाठी विविध निर्णय घेण्यात आले असून, सुमारे ५,३०० जणांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. तसेच सारथी संस्थेलाही न्याय देण्यात आला असल्याचे गोगावले यांनी सांगितले. जरांगे पाटील यांनी राजकारणावर भाष्य केले तर आम्हीही त्याला उत्तर देऊ. ''आम्हीही मराठे आहोत. आमच्यावरही केसेस आहेत. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एकेरी भाषेत बोलाल तर जशास तसे उत्तर देऊ,'' असा इशारा गोगावले यांनी दिला. हा रायगडच्या मावळ्याचा इशारा असल्याचेही त्यांनी म्हटले. एकीकडे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटील आंदोलनावर ठाम आहेत, तर दुसरीकडे ओबीसी आणि आदिवासी समाजाकडूनही आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलनाची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

----------------

### मुंबईत गांधी यांच्याविरोधात

या निर्णयामुळे राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ झाली असून, त्यांना कनिष्ठ न्यायालयात मानहानीच्या खटल्याला सामोरे जावे लागणार आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी न्यायालयाने राहुल गांधी यांना दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर राहण्यापासून सहा आठवड्यांचा दिलासा दिला आहे. गिरगाव दंडाधिकारी न्यायालयाने राहुल गांधी यांना बजावलेल्या समन्सच्या आदेशात कोणतीही बेकायदेशीरता किंवा त्रुटी आढळलेली नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गतातील विशेष अधिकारांचा वापर करून या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही, असे न्यायमूर्ती एन. आर. बोरकर यांच्या एकल खंडपीठाने स्पष्ट केले. भाजप कार्यकर्ते व महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे सदस्य महेश श्रीश्रीमल यांनी गिरगाव दंडाधिकारी न्यायालयात राहुल गांधी यांच्याविरोधात ही मानहानीची तक्रार दाखल केली होती. सप्टेंबर २०१८ मध्ये राजस्थानमधील एका सभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींविरोधात अब्रूनुकसानीकारक वक्तव्य केले होते, असा आरोप तक्रारदाराने केला आहे. या वक्तव्यामुळे पंतप्रधान मोदी यांची समाजमाध्यमे व वृत्तवाहिन्यांवर नाहक बदनामी झाल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता. याप्रकरणी ऑगस्ट २०१९ मध्ये दंडाधिकारी न्यायालयाने गांधी यांना समन्स बजावले होते. हे समन्स जुलै २०२१ मध्ये मिळाल्यानंतर राहुल गांधी यांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

----------

### एका समाजाच्या वाट्यातील

निर्णय घेतले असून, त्यांचे प्रत्यक्ष फायदे समाजाला मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. भविष्यात मराठा आरक्षणासंदर्भात आवश्यक असलेले निर्णय संविधानाच्या चौकटीत राहून आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करून घेतले जातील, असे फडणवीस यांनी सांगितले. संविधानाच्या चौकटीत जे काही शक्य आहे, ते सरकार निश्चितपणे करेल. तसेच न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन असलेल्या बाबींवर कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सरकारने केवळ कागदावर निर्णय घेतले नसून, त्या निर्णयांचा लाभ मराठा समाजाला प्रत्यक्ष मिळत असल्याचे फडणवीस म्हणाले. सरकार मराठा समाजासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करेल. तसेच सरकारने संवादाचे दरवाजे कधीही बंद केलेले नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. सरकार चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढते आणि त्याच भावनेने संपूर्ण प्रक्रिया पुढे सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी मराठा समाजाने उपस्थित केलेले सर्व मुद्दे निकाली काढण्यात आल्याचा दावा फडणवीस यांनी केला. मात्र, त्यानंतरही काही त्रुटी राहिल्या आहेत किंवा काही बाबींविषयी शंका असल्यास त्या सरकारसमोर मांडाव्यात. त्या शंकांचे निरसन करण्यासाठी सरकार तयार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू केले आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची त्यांची प्रमुख मागणी आहे. आंदोलनाचा कालावधी वाढत असताना सरकार आणि आंदोलक यांच्यातील चर्चेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे ओबीसी समाजाचे घटनात्मक अधिकार आणि आरक्षण अबाधित ठेवण्याच्या मागणीसाठी ओबीसी समाजातील कार्यकर्त्यांनीही अंतरवाली सराटीत आंदोलन केले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न अधिक संवेदनशील बनला असून, सरकारसमोर मराठा समाजाच्या मागण्या आणि ओबीसी समाजाचे आरक्षण या दोन्ही बाबींमध्ये संतुलन राखण्याचे आव्हान आहे.

-------------

### संतोष पंडित यांची येरवडा

एक गुन्हा नोंद आहे. तो सोशल मिडीयावरील ॲक्टिव्ह मेंबर असून तो अशाच प्रकारे महिलांविषयी व संविधानिक पदावरील व्यक्तीचे विरुध्द आक्षेपार्ह अवमानकारक व्हिडीओ टाकून ते सोशल मिडीयावर प्रसारित करून समाजात अशांतता पसरविण्याची शक्यता नाकारता येत नाही. याप्रकरणात अद्यापपर्यंत साक्षीदार यांकडे तपास सुरू आहे. आरोपी साक्षीदार यांचेवर दबाव टाकून सोशल मिडीयावर त्यांची बदनामी करण्याची शक्यता आहे. त्याचे आणखी कोणी साक्षीदार आहेत का याचा तपास करून आरोपीविरुध्द पुरावे उपलब्ध करून न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करायचे असल्याने त्याला न्यायालयीन कोठडीची मागणी ॲड. कदम यांनी केली. न्यायालयाने ती ग्राह्य धरत १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. पंडित याच्या वतीने ॲड. वाजेद खान बीडकर, ॲड. सिसोदिया यांनी कामकाज पाहिले.

---------------

### ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय

हस्ते विजेत्यांना हे मानाचे पुरस्कार प्रदान केले जातील. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीच्या बाहेर देशाच्या विविध भागांत आयोजित करण्याचा मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. एक भारत, श्रेष्ठ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे आणि प्रादेशिक विविधतेला सन्मान देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. १९५४ मध्ये स्थापन झालेले हे राष्ट्रीय पुरस्कार भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित सन्मान मानले जातात. ७ दशकांपासून दिल्लीत होणाऱ्या या सोहळ्याचे ठिकाण बदलून यंदा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ५९७ फूट उंच स्मारकासमोर (स्टॅच्यू ऑफ युनिटी) ठेवण्यात आले आहे. वर्ष २०२४ मधील भारतीय सिनेमातील उत्कृष्ट कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जाणार असून यामध्ये मामुटी, कार्तिक आर्यन, यामी गौतम सर्वोत्कृष्ट अशा अनेक दिग्गज कलाकारांचा गौरव केला जाणार आहे. यंदाच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये प्रादेशिक भाषांमधील चित्रपटांचा मोठा दबदबा पाहायला मिळणार आहे. यामध्ये मराठी, संथाली, तमिळ, मल्याळम, तेलगू, कन्नड, तुळू आणि गढवाली भाषांमधील उत्कृष्ट चित्रपटांचा गौरव केला जाईल. विशेष म्हणजे, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या नॉन-फीचर फिल्म श्रेणीमध्ये पहिल्यांदाच एका संथाली भाषेतील चित्रपटाला सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय कल्कि २८९८ एडी, अमरन, पुष्पा २: द रुल, भूल भुलैया ३ आणि स्त्री २ यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांनाही विविध श्रेणींमध्ये पुरस्कार मिळाले आहेत.

-----------------

### राज्यात शुक्रवारपासून

विभागाने स्पष्ट केले आहे. शुक्रवारी मात्र विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. तसेच मराठवाड्यातील नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. शनिवारी विदर्भासह मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पाऊस हजेरी लावण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात, असाही अंदाज हवामान विभागाने दिला आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यात विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर सातारा, सांगली, सोलापूर, जळगाव आणि नंदूरबार जिल्ह्यात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकणातील रायगड आणि ठाणे जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज असून मुंबई आणि पालघर जिल्ह्यात ढगाळ हवामानसह हलक्या सरी पडतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

-----------

### मराठा आरक्षणासाठी

येथे मृतदेह ठेवून रास्ता रोको आंदोलन सुरू केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास सुमठाणा येथील सुनील बिरादार यांनी गावातीलच विहिरीत उडी घेतली. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन शोध घेतला असता, त्यांच्याजवळ एक सुसाईड नोट आढळली. त्यात त्यांनी मराठा आरक्षणासाठी बलिदान देत असल्याचे नमूद केले होते. मृतदेह विहिरीबाहेर काढल्यानंतर संतप्त गावकऱ्यांनी आणि कुटुंबीयांनी प्रशासकीय दिरंगाईविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. गावकऱ्यांनी मृतदेह थेट उदगीर-लातूर मुख्य महामार्गावर आणून ठेवला आणि वाहतूक पूर्णपणे रोखून धरली. मयत सुनील बिरादार यांच्या कुटुंबातील एका सदस्याला तात्काळ शासकीय सेवेत सामावून घेण्याचे लेखी आश्वासन द्यावे. मराठा समाजाला सरसकट कुणबी/जात प्रमाणपत्र वाटप करण्याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लेखी द्यावे. जोपर्यंत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी येऊन मागण्या मान्य करत नाहीत, तोपर्यंत अंत्यविधी करणार नाही आणि मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा ठाम निर्णय आंदोलकांनी घेतला आहे.

-------------

## टी.सी.हरवला आहे

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की मी शेख जुलेखा बेगम शेख हारुण राहणार तय्यब नगर गेवराई. मी गेवराई बस स्टँड ते तय्यब नगर रिक्षात येताना माझी टी.सी ५/९/२०२६ रोजी हरवली आहे. महिला बी,एड कॉलेज बीड ची टी.सी वर माझा जनरल रजिस्ट्रेशन नंबर १४५७ आणि जन्मतारीख २१/१/१९८८ अशी आहे सदर टी.सी कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांक वर संपर्क साधावा.

**-::संपर्क::-**

**पत्ता:- तय्यब नगर गेवराई तालुका गेवराई**

**मो.८८०५५६२२६४**

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०९ सप्टेंबर २०२६



# बीड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा

## जयसिंह सोळंके यांची कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे मागणी

**वडवणी । प्रतिनिधी**

यंदाच्या पावसाने बीड जिल्ह्यासह मराठवाड्यावर अवकृपा दाखवली असल्याने शेतकरी राजा आर्थिक कचाट्यात सापडला आहे या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसह बीड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा जनावरांसाठी चारा छावणी उभारण्यासह अन्य मागण्यासाठी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांनी मंगळवार दि ८ रोजी थेट राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांची भेट घेऊन याबाबतचे निवेदन देत परिस्थितीची चर्चा केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, यंदाच्या पावसाने मराठवाड्यासह बीड जिल्ह्यावर विशेष अवकृपा दाखवली आहे. शेतातील पिकवलेले पीक पावसा अभावी करपून गेले आहे. तर शेतकरी राजाच्या मेहनतीवर आणि स्वप्नांवर निसर्गाने काळीज करपविले आहे. त्यामुळे शेतकरी राजाही आर्थिक कचाट्यात सापडला आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत मिळावी. या एकमेव उद्देशाने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंह सोळंके यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांची मुंबई येथे विशेष भेट घेऊन दुष्काळी मागण्याची निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये अत्यल्प पर्जन्यमान झाले आहे. त्यामुळे



खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, मुग, उडीद, तीळ, तूर, इत्यादी पिके मोठ्या प्रमाणावर करपले आहेत. शेतकरी आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या शेत पिकाचे नुकसान झाले असून तात्काळ राज्य सरकारने कोरडा दुष्काळ जाहीर करून शासनाकडून आर्थिक मदत मिळावी. तसेच बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्याने पशुधन (जनावरे) यासाठी चारा छावण्या सुरु करणे आवश्यक आहे. तरी बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत तात्काळ द्यावी. यासह अन्य मागण्यासाठी कृषीमंत्री नामदार दत्ता मामा भरणे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे. तर मराठवाड्याच्या आणि बीड जिल्ह्यातील शेती विषयावर आणि सरकारच्या उपाय योजना काय असाव्यात यावर युवा नेते जयसिंह सोळंके व कृषी मंत्री दत्ता मामा भरणे या दोघांमध्ये खूप काळ चर्चा झाली असून जयसिंग सोळंके यांच्या निवेदनावर नक्कीच चर्चा करू असे आश्वासन कृषिमंत्री यांनी दिली आहे.

जयसिंह सोळंके शेती जलसिंचनासाठी आग्रही

माजलगाव विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्हा व मराठवाडा विभागातील शेतातील पीक प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. हा प्रश्न सरकारच्या कानी पडावा तसेच प्रतीक्षेत हकीकत काय आहे याचा सारांश मानण्यासाठी युवा नेते जयसिंह भैय्या सोळंके यांनी थेट कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन थेट संवाद साधत तात्काळ उपायोजना व घोषणा करावी अशी मागणी केली असल्याने युवा नेते जयसिंह भैय्या सोळंके हे शेतकऱ्यांच्या शेती व जलसिंचन प्रश्नासाठी नियमीत आग्रेसर असल्याचे दिसून येत आहेत.

## थोडक्यात



### वरद दत्तप्रसाद इंदाणी यांची के.ई.एम मुंबई येथे एम.बी.बी.एससाठी निवड

माजलगाव ( प्रतिनिधी ) येथील वरद दत्तप्रसाद इंदाणी यांनी निट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत मुंबई येथील प्रतिष्ठित सेठ जी.एस. मेडिकल कॉलेजचे के.ई.एम. रुग्णालयात एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे. त्यांच्या या यशाबद्दल माहेश्वरी सभेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच माजलगाव शहरासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वरद इंदाणी यांनी निट परीक्षेत ६२४ गुण मिळवत अखिल भारतीय क्रमांक (ए.आय.आर.) ४४२९, तर महाराष्ट्र राज्य क्रमांक ३०४ प्राप्त केला. त्यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.

निट परीक्षेच्या तयारीसाठी पुण्यातील प्रसिद्ध झा शिक्षण सेवा संस्था येथे त्यांनी तयारी केली. इयत्ता दहावीपर्यंत सिंदफणा पब्लिक स्कूल येथे शिक्षण घेतले.शालेय जीवनापासूनच अभ्यासात सातत्य ठेवत होता त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते.वरद दत्तप्रसाद इंदाणी यांला भविष्यात उत्कृष्ट डॉक्टर बनून समाजाची सेवा करावी अशा शुभेच्छा माहेश्वरी सभेच्या वतीने देण्यात आल्या.



### सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या नंदिनी गर्गेचे युवा महोत्सवात घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासंयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हा युवा महोत्सव २०२६ सिरसळा येथील श्री. पंडित गुरुपारडीकर महाविद्यालय येथे उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवात सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगावची गुणवंत विद्यार्थिनी कुमारी नंदिनी गर्गे हिने विविध कलाप्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले.

नंदिनी गर्गे हिने मृदमूर्ती कला प्रकारात प्रथम क्रमांक, पोस्टर स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर रांगोळी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत आपल्या कलागुणांची चमक दाखवली. एकाच युवा महोत्सवात तीन पारितोषिके मिळवून तिने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ऑक्टोंबर महिन्यात होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहे.नंदिनी गर्गे हिला प्रा. डॉ. के.बी.गंगणे ,डॉ.बी.आर.नळे , डॉ.अरुण पेंटावा,र,डॉ. अर्चना कचरे डॉ. पी.ए.देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. नंदिनी गर्गे हिच्या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ एन के मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए कव्हळे ,उपप्राचार्य प्रकाश गवते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## बेकायदा खरेदीखत व फेरफार रद्द करण्याची मागणीसाठी बहुजन विकास मोर्चाचे तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील एका जमिनीच्या खरेदी–विक्री व फेरफार प्रकरणात बेकायदेशीरपणे व्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित खरेदीखत, फेरफार नोंदी व सातबारा उताऱ्यांची चौकशी करून ते रद्द करण्याची मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.या मागणीसाठी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने दि ०७ सप्टेंबर सोमवार पासून उपोषण सुरू करण्यात आले आहे.




यासंदर्भात बहुजन विकास मोर्चाच्या वतीने तहसीलदार माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, माजलगाव येथील सर्वे नंबर/गट ०९ नंबरातील जमिनीच्या मालकी व खरेदी–विक्री व्यवहाराबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत.संबंधित जमिनीचे विविध तुकड्यांमध्ये खरेदीखत करून फेरफार नोंदी करण्यात आल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे.

या प्रकरणात संबंधित जमीन देवखेडा गावठाणासाठी संपादित क्षेत्राशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला असून, जमिनीच्या मालकी हक्काबाबत न्यायालयीन वादही सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.मा. दिवाणी न्यायाधीश, माजलगाव यांच्या न्यायालयात संबंधित प्रकरण दाखल असून त्यासंदर्भात स्थगिती आदेश असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. निवेदनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जमिनीवर प्रत्यक्ष मालकी नसताना काही व्यक्तींनी बनावट अथवा चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे व्यवहार केल्याचा संशय आहे.तसेच महसूल विभागातील संबंधित कागदपत्रे, सातबारा उतारे आणि फेरफार नोंदींची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात महसूल कार्यालयातील नोंदींचा आधार घेऊन जमीन अन्य व्यक्तींच्या नावावर हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित खरेदीखत, फेरफार नोंदी व इतर कागदपत्रांची स्वतंत्र चौकशी करून दोषी व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तहसीलदारांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती चौकशी करावी आणि कायद्यानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.असुन वरील मागणीसाठी माजलगाव तहसील कार्यालयासमोर बहुजन विकास मोर्चाच्या वतीने दि ०७ सप्टेंबर सोमवार रोजी पासुन बहुजन विकास मोर्चाचे जेष्ठ नेते कचरु तात्या खळगे,नवनाथ धायजे,विजय वारजे, प्रदिप पट्टेकर,शेख बाबा, शेख जावेद दिलावर यांनी उपोषण सुरू केले आहे.

## गिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पालखी सोहळ्यात तांदळेश्वर शाळेच्या मुलींनी लेझीमाच्या तालावर अंधापुरी ग्रामस्थांचे वेधले लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगणचे तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेतील मुलींनी आज अंधापुरी गावामध्ये ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे पूर्वज असणारे गिरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य दिव्य पालखी सोहळ्याचे आयोजन केले आज भल्या पहाटे ह भ प महादेव महाराज यांनी अभिषेक करून कार्यक्रमाला सुरुवात केली होती या कार्यक्रमासाठी तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेतील मुलींनी अंधापुरी व पंचक्रोशीतील आलेल्या सर्व महिला लहान थोर सर्वांचे गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले श्री डाके सर्व त्यांच्या टीमने सामाजिक उपक्रम म्हणून समाज वरून फेडण्याचे कार्य या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने अंधापुरी



ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन सहभाग घेतला विद्यार्थिनींनी

फेटे घालून श्रीकृष्णाच्या गवळणी शिवरायांचे गाणे इत्यादी विविध गाण्यावरती डॉल्बीच्या तालावर गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले तसेच गावकऱ्यांनी लेझीमाचा ठेका धरत अंधापुरी गावामध्ये आज अतिशय आनंदाचा आणि जल्लोषाचे वातावरण दिसून आले अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके यांनी दिली संस्थेचे सचिव डॉ योगेश भैय्या व डॉ सारिका ताई यांच्या मार्गदर्शनाने विद्यालय नेहमी सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असते याप्रसंगी गावकऱ्यांच्या वतीने एमबीबीएस साठी छत्रपती संभाजीनगर येथे हेगडेवार हॉस्पिटलला ऍडमिशन झालेले शुभम लहाने विठ्ठल राव लहाने सर यांचे चिरंजीव यांचा सत्कार श्री श्याम डाके सर यांच्या हस्ते करण्यात आला

त्याचबरोबर गुणवंत मध्ये आणखी पुणे मेट्रो पायलेट वैष्णवी दिनकर लहाने या विद्यार्थिनीचा सत्कार मनीषाताई जगताप सरपंच अंधापुरी यांच्याकडून सत्कार करण्यात आला त्याचबरोबर घोडके विद्यार्थिनीचाही सत्कार करण्यात आला गावकऱ्यांच्या वतीने गावातील सरपंच व त्यांच्या सर्व टीमने तांदळेश्वर विद्यालयाचे श्री डाके सर वामने सर लहाने सर काटवटे काळे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. श्री डाके सर यांनी सर्वांचे आभार मानले.

गावकऱ्यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते या कार्यक्रमासाठी गावातील सर्व प्रतिष्ठित आजी माजी सरपंच चेअरमन सर्व ग्रामपंचायत सदस्य सर्वांची उपस्थिती होती बुंदी जामुन बर्फी सह वरण–भात भाजी चे संपूर्ण गाव परिसराला अन्नदान करण्यात आले दिमाखामध्ये पालखी सोहळा संपन्न झाला.



## मोठेवाडी जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सोमवारी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मोठेवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सतीश डोणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला. यावेळी या त्यांच्या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने शिक्षक सतीश डोणे यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शालेय व्य.समितीचे अध्यक्ष नाथा रासवे,उपाध्यक्ष विलास खेत्री,पत्रकार राजाभाऊ पास्टे,हरीश जाधव,मुख्याध्यापक तुकाराम शिंदे, शिक्षक उत्तम ढवळे,गेना पवार,वसंत टाकणखार, आदींसह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

## पाटोदा येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात १०१ पार्थिव शिवलिंग सोहळा उत्साहात संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून क्रांतीनगर, पाटोदा येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात १०१ पार्थिव शिवलिंग पूजनाचा सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या धार्मिक आणि आध्यात्मिक सोहळ्यात परिसरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून, सुमारे १५०० भाविकांची उपस्थिती लाभली होती.



शुद्ध मातीपासून बनवली १०१ शिवलिंगे

या सोहळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे भाविक व सेवेकऱ्यांनी स्वतःच्या हाताने शुद्ध माती आणून अत्यंत श्रद्धेने १०१ पार्थिव शिवलिंगे तयार केली होती. या सर्व शिवलिंगांची विधिवत पूजा करून आरतीच्या स्वरूपात सेवा पार पडली.

५१ प्रकारचा महाअभिषेक आणि पावसासाठी साकडे

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे ५१ प्रकारच्या द्रव्यांनी पार पडलेली महाअभिषेक सेवा होय. परिसरात चांगला पाऊस व्हावा, शेतकरी व बळीराजा सुखी व्हावा आणि सर्वत्र समृद्धी यावी, या उद्देशाने पावसासाठी महादेवाला हे विशेष साकडे घालून अभिषेक सेवा करण्यात आली.

२०% अध्यात्म आणि ८०% समाजकारण

दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या '२० टक्के अध्यात्म आणि ८० टक्के समाजकारण' या तत्त्व प्रणालीनुसार या सेवा केंद्रात अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी आणि लोककल्याणासाठी सातत्याने विविध सेवा व उपक्रम राबवले जातात. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी स्वामी सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

### बीड व धाराशिव जिल्ह्यात हैदोस

मोहा कळंब, जि. धाराशिव) संतोष बारीकराव शिंदे (वय २२, रा. पारधी वस्ती, मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव) दिनेश नागनाथ काळे (वय २४, रा. कुरणे नगर, धाराशिव)

पोलीस कोठडीदरम्यान (PCR) आरोपींकडून ३२ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून, या गुन्ह्यातील इतर दोन फरार साथीदारांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. या टोळीप्रमुखाने संघटित टोळी तयार करून बीड व धाराशिव जिल्ह्यात शस्त्रांचा धाक दाखवून आर्थिक फायद्यासाठी तब्बल ८ गंभीर गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नवीन भारतीय न्याय संहितेनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी नेकनूरचे प्रभारी अधिकारी (स.पो.नि.) यांना कलम १११ (संघटित गुन्हेगारी / मिनी मोक्का) लावण्याची अधिकृत परवानगी दिली आहे. सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी तथा स.पो.अ. वेंकराम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूरचे स.पो.नि. मंगेश साळवे, पोउपनि पदमाकर आहेर, पोउपनि शंकर गलधर, पोलीस अंमलदार विशाल क्षिरसागर, सुधाकर जायभाये तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोउपनि अभिमन्यू औताडे, बिभीषण चव्हाण व बबन सलगर यांच्या पथकाने पार पाडली.

**गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील**

जिल्ह्यात चोरी, घरफोडी व संघटित गुन्हेगारी करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या गुन्हेगारी टोळ्यांवर मोक्का व कठोर प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येतील.

– नवनीत काँवत (पोलीस अधीक्षक, बीड)

### माजलगाव धरणाची उंची

योजनेचा धरणाची उंची वाढवण्याशी काही संबंध नाही यासाठी सावंगी सादोळा योजना व धरणातील गाळ काढणे पर्याय ठरू शकतात या बाबीचा विचार करूनच पुढील निर्णय घ्यावा धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय रद्द होईपर्यंत मागे हटणार नाही ''शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणून विकास आम्हाला मान्य नाही. पुनर्वसित शेतकऱ्यांवर पुन्हा विस्थापन लादण्याचा प्रयत्न झाल्यास त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आपण ठामपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहू,'' असा इशारा मोहनदादा जगताप यांनी दिला.

## पान ६ वरुन...

### नरेगाच्या कुशल कामांचे

न राहता प्रत्यक्षात साध्य व्हायचा असेल, तर पूर्ण झालेल्या कामांची देयके वेळेत अदा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ऑनलाइन झालेली कुशल बिले तपासून त्यामध्ये नियमबाह्य बाबी नसतील तर कोणाच्याही दबावाला बळी न पडता संबंधित कामांची पेमेंट प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी ठाम भूमिका शिवसेनेच्या वतीने घेण्यात आली आहे. पेमेंटला अनावश्यक विलंब झाल्यास लाभार्थी, ग्रामपंचायती तसेच संबंधित कामाशी निगडित नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने प्रलंबित देयकांचा तातडीने निपटारा करून नरेगा योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळतील, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केले आहे. तसेच नरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची पेमेंट मिळण्यात कोणाची अडवणूक होत असेल किंवा विनाकारण देयक रोखले जात असेल, तर संबंधित लाभार्थ्यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे संपर्क साधावा, असे आवाहनही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे. लाभार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मांजरसुंबा येथील हॉटेल विराज

निजामोद्दीन बक्षुद्दीन शेख, शकीलभाई युनूसभाई वोहरा, विष्णू अर्जुन निमुडे आणि संदीप छत्रभुज खोटे अशा १९ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली. परवान्यातील अटींचे उल्लंघन करून जुगार खेळला जात असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाल्याने संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम ४ व ५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने केली. कारवाईत पोलीस अक्षय लोंढे यांचा सहभाग होता. अवैध जुगार, मटका, गुटखा आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात कारवाई यापुढेही सुरूच राहणार असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा उ्रधडझ भारत पांढरे यांनी दिला.

### गोदावरी नदीपात्रात एलसीबीचा

रा. सुरळेगाव, ता. गेवराई) विकास अनिल तोतरे (वय २५, रा. गुळज, ता. गेवराई) याना पकडले. पोलिसांनी घटनास्थळावरून वेगवेगळ्या कंपन्यांचे ४ ट्रॅक्टर आणि ४ लोखंडी केन्या असा एकूण ३२ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपींविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अर्जुन यादव, पोलीस अंमलदार बबन सलगर, मनोज परजणे, अश्पाक सय्यद आणि चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे यांच्या पथकाने केली.

### शुक्रवारी उपविभागीय कार्यालयावर

करण्यात आली आहे.पाटोदा तालुक्यात अल्पवयीन मुली व महिलांवरील गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना, पोलीस गस्त आणि तातडीची कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

चिमुकलीच्या न्यायाच्या लढ्याला बळ द्यावे – बाळा बांगर

''हा मोर्चा केवळ एका चिमुकलीच्या न्यायासाठी नसून, तालुक्यातील प्रत्येक मुलगी आणि महिलेच्या सुरक्षिततेसाठी आहे. नागरिकांनी शांततेच्या मार्गाने मोठ्या संख्येने सहभागी होऊन चिमुकलीच्या न्यायाच्या लढ्याला बळ द्यावे,'' असे आवाहन विजयसिंह (बाळा) बांगर यांनी केले आहे.

हा लढा महिलेच्या सुरक्षिततेसाठी म्हणून आयोजन आपल्या सर्वांचे

महिला सुरक्षिततेचा मुद्दा जेव्हा पुढे येतो तेव्हा त्याची सर्व जबाबदारी आपल्या प्रत्येकावर असते म्हणूनच नाळवंडीतील त्या चिमुकलेच्या न्याय हक्कासाठी उभारलेला हा लढा आपल्या सर्वांचा आहे. या लढ्याचं आयोजन समस्त नाळवंडी ग्रामस्थ तथा पंचक्रोशी व रामकृष्ण बांगर प्रतिष्ठान, पाटोदा यांच्यावतीने करण्यात आले असून या लढ्याला बळ देण्याची जबाबदारी सर्व नागरिकांची आहे त्यामुळे सर्वांनीच मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा लढा मोठा करावा आणि त्या चिमुकलीला न्याय देऊन भविष्यात महिलेच्या सुरक्षिततेला बळ द्यावे.

cmyk




# पीकविमा न देणाऱ्या इफकोला दणका!

## शेतकऱ्याला ७० हजारांची भरपाई; ९ टक्के व्याजासह देण्याचे आदेश

नांदेड / प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाल्यानंतरही विमा दावा नाकारणे इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी ला चांगलेच महागात पडले आहे. पीकविमा भरूनही नुकसानभरपाईपासून वंचित ठेवलेल्या मुखेड तालुक्यातील शेतकऱ्याच्या बाजूने नांदेड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने निकाल दिला आहे. विमा कंपनीने शेतकऱ्याला ७० हजार १३२ रुपये पीकविमा रक्कम ९ टक्के वार्षिक व्याजासह, तसेच मानसिक व शारीरिक त्रासापोटी आणि कायदेशीर खर्चासाठी प्रत्येकी ५ हजार रुपये देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

मुखेड तालुक्यातील वसूर येथील शेतकरी बालाजी वाचू राठोड यांनी सन २०२० च्या खरीप हंगामासाठी प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत विविध पिकांचा विमा काढला होता. यासाठी त्यांनी ऑनलाइन पद्धतीने २ हजार ५३० रुपये विमा हप्ता भरला होता. या विम्यामध्ये सोयाबीन, तूर, मूग, ज्वारी आणि उडीद या पिकांचा समावेश होता. सप्टेंबर २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राठोड यांच्या शेतातील सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पीक हातचे गेल्यानंतर विमा योजनेच्या नियमानुसार नुकसानभरपाई मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्याला होती. मात्र विमा हप्ता भरूनही



आणि आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असूनही कंपनीकडून त्यांना पीकविम्याची भरपाई मिळाली नाही. त्यामुळे राठोड यांनी विमा कंपनीकडे नुकसानभरपाईसाठी पाठपुरावा केला. मात्र त्यांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी अखेर . व्ही. जी. पाटील यांच्यामार्फत नांदेड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात तक्रार दाखल केली. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला. वसूर गावातीलच अन्य एका शेतकऱ्याला सोयाबीन पिकाच्या नुकसानीपोटी प्रति हेक्टरी ३९ हजार ४७८ रुपये या प्रमाणात विमा भरपाई देण्यात आली होती. त्यामुळे समान परिस्थितीत असलेल्या तक्रारदार शेतकऱ्याला भरपाईपासून का वंचित ठेवण्यात आले, हा प्रश्न उपस्थित झाला. उपलब्ध पुरावे आणि प्रकरणातील बाबींचा विचार केल्यानंतर आयोगाने विमा कंपनीच्या सेवेत त्रुटी असल्याचे स्पष्ट केले. शेतकऱ्याने विमा हप्ता भरलेला असताना आणि त्याच गावातील अन्य विमाधारक शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळालेली असताना तक्रारदाराला विमा दाव्यापासून वंचित ठेवणे योग्य नसल्याचे आयोगाने नमूद केले.

९ टक्के व्याजासह भरपाई : जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष राहुल पाटील आणि सदस्य ज्ञानेश्वर पवार यांनी ५ ऑगस्ट रोजी या प्रकरणात निकाल दिला. आयोगाने इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीला शेतकऱ्याला १.८७ हेक्टर सोयाबीन क्षेत्रासाठी ७० हजार १३२ रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे ही रक्कम ४ डिसेंबर २०२३ रोजी तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ९ टक्के वार्षिक व्याजासह देण्याचे निर्देश आहेत. याशिवाय शेतकऱ्याला झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासापोटी ५ हजार रुपये आणि कायदेशीर खर्चापोटी ५ हजार रुपये देण्याचेही आदेश आयोगाने दिले आहेत.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निकाल : पीकविमा भरल्यानंतर नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे नुकसान झाल्यासही विमा दावा मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून अनेकदा केल्या जातात. अशा परिस्थितीत संबंधित कागदपत्रे, विमा हप्ता भरल्याचा पुरावा, पीकनुकसानाची नोंद आणि विमा दाव्याशी संबंधित कागदपत्रे जतन करणे महत्त्वाचे ठरते. नांदेड जिल्हा ग्राहक आयोगाचा हा निकाल पीकविमा कंपन्यांच्या सेवेतील त्रुटींविरोधात शेतकऱ्यांना कायदेशीर दाद मागण्यासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकतो.

# महिलांनाही मिळू शकतो प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ




पुणे : भारत एक कृषीप्रधान देश आहे, जिथे देशाच्या अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यामुळे, महिला शेतकऱ्यांनाही प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा, किंवा पीएम किसान योजनेचा लाभ मिळू शकतो का, असा प्रश्न लोकांना अनेकदा पडतो. शासकीय नियमांनुसार, या योजनेअंतर्गत महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. जर एखाद्या महिलेकडे लागवडीयोग्य जमीन असेल, तर ती या योजनेअंतर्गत वार्षिक आर्थिक मदतीसाठी सहजपणे अर्ज करू शकते. महिला शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची पात्रता : पीएम-किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्वात महत्त्वाची अट म्हणजे अर्ज करणाऱ्या महिला शेतकऱ्याच्या नावावर जमिनीची मालकी किंवा हक्क असणे आवश्यक आहे. जर जमीन तिच्या नावावर नोंदणीकृत असेल, तर ती या योजनेसाठी पूर्णपणे पात्र मानली जाते.

पती आणि पत्नी दोघेही लाभ घेऊ शकतात का? नियमांमधील स्पष्ट तरतुदींनुसार, एकाच कुटुंबातील पती आणि पत्नी दोघेही या योजनेअंतर्गत एकाच वेळी लाभ घेऊ शकत नाहीत. ही आर्थिक मदत प्रत्येक कुटुंबासाठी (पती, पत्नी आणि अल्पवयीन मुले) निश्चित केली जाते. योजनेअंतर्गत आर्थिक मदत : या योजनेद्वारे पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी एकूण ६,००० दिले जातात.

ही रक्कम लाभार्थी महिला आणि पुरुष शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटीद्वारे प्रत्येकी २,००० च्या तीन हप्त्यांमध्ये हस्तांतरित केली जाते. कोणत्या महिला या योजनेसाठी पात्र नाहीत? जर महिला शेतकरी सरकारी सेवेत असतील, आयकर भरत असतील किंवा घटनात्मक पदावर असतील, तर त्या या योजनेच्या लाभांसाठी पात्र नाहीत. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की हा नियम केवळ महिला शेतकऱ्यांनाच नव्हे, तर पुरुष शेतकऱ्यांनाही लागू होतो. शिवाय, जर कुटुंबाकडे स्वतःची जमीन नसेल, तर हा अर्ज वैध ठरत नाही.ी

# फायदेशीर आणि कमी कालावधीत येणारे कंदवर्गीय पीक बीट

बीट हे एक अत्यंत फायदेशीर आणि कमी कालावधीत येणारे कंदवर्गीय पीक आहे. शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढवण्यासाठी बीट अत्यंत गुणकारी मानले जाते, त्यामुळे बाजारपेठेत याला वर्षभर चांगली मागणी असते.

हवामान आणि जमीन : बीट हे थंड हवेतील पीक आहे. या पिकाच्या उत्तम वाढीसाठी १५ ते २५ तापमान पोषक असते. अति उष्ण हवामानात बीट कडक बनतात आणि त्यांचा रंग फिकट होतो. लागवडीसाठी मध्यम ते भारी, सुपीक आणि उत्तम निचरा असणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू () ६ ते ७ च्या दरम्यान असावा. चोपण किंवा पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत बीटची लागवड करू नये.

सुधारित वाण : उत्तम उत्पादनासाठी खालील सुधारित जातींची निवड करावी. हा वाण भारतात अत्यंत लोकप्रिय आहे. याचे कंद गोल, गडद तांबड्या रंगाचे आणि गोड असतात. हे कंद गोलाकार, मध्यम आकाराचे आणि चवीला उत्तम असतात. हा लवकर तयार होणारा वाण असून कंद थोडे चापट गोल असतात.

लागवडीचा हंगाम आणि पद्धत : बीटची लागवड प्रामुख्याने रब्बी हंगामात (ऑक्टोबर ते नोव्हेंबर) केली जाते. मात्र, जेथे हवामान थंड व समशीतोष्ण असते, तिथे वर्षभरात कधीही लागवड करता येते.

एक हेक्टर लागवडीसाठी साधारणपणे ७ ते ८ किलो बियाणे लागते. लागवडीचे अंतर : दोन ओळींमधील अंतर: ३० सेमी. दोन रोपांमधील अंतर: १० सेमी. बिया जमिनीमध्ये साधारण १.५ ते २ सेमी खोलीवर पेराव्यात.

खत आणि पाणी व्यवस्थापन : जमीन तयार करताना प्रति हेक्टरी १५ ते २० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी ६० ते ८० किलो नायट्रोजन, ६० किलो फॉस्फरस आणि ८० किलो पोटॅश प्रति हेक्टरी द्यावे. पेरणीनंतर ३० दिवसांनी पुन्हा ३० किलो नायट्रोजनचा हप्ता द्यावा. बियांची उगवण होईपर्यंत जमिनीच्या गरजेनुसार हलके पाणी द्यावे. थंड हवामानात ८ ते १० दिवसांच्या अंतराने, तर उबदार हवामानात ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. जमिनीमध्ये सतत ओलावा असणे कंदांच्या वाढीसाठी आवश्यक आहे. आंतरमशागत आणि काढणी :बीटचे बी बहुतांश वेळा बहु-भ्रूणीय असते, म्हणजेच एका बीपासून २ ते ३ रोपे निघतात. त्यामुळे पेरणीनंतर १५-२० दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एकच सशक्त रोप ठेवावे. पीक सुरुवातीच्या काळात तणमुक्त ठेवणे गरजेचे आहे. गरजेनुसार १ ते २ खुरपण्या कराव्यात. बीट हे लागवडीपासून साधारण ६० ते ७० दिवसांत काढणीसाठी तयार होते. कंदांचा व्यास ५ ते ७ सेमी झाला की काढणी करावी. जास्त दिवस कंद जमिनीत राहिल्यास ते निबर आणि चिवट बनतात.

उत्पादन : योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति हेक्टरी साधारण २० ते २५ टन बीटाचे दर्जेदार उत्पादन मिळते. काढणीनंतर कंद स्वच्छ धुवून, पानांसह किंवा पाने कापून बाजारात विक्रीसाठी पाठवले जातात.



# डाळिंब शेतीत 'एआय', क्लीन प्लँट फायदेशीर

सोलापूर : हवामान बदल, रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि जमिनीची ढासळती गुणवत्ता या पार्श्वभूमीवर डाळिंबाची उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन आणि रोगमुक्त रोपांची (क्लीन प्लॅन्ट) निर्मिती अत्यंत महत्त्वाची ठरेल, असा सूर आंतरराष्ट्रीय डाळिंब परिषदेत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केला.

'भारतीय डाळिंब शेतीचे यश, क्षमता, भविष्यातील संधी आणि हवामान सक्षम डाळिंब परिसंस्था' या मध्यवर्ती संकल्पनेवर परिषदेतील तांत्रिक सत्रात शास्त्रज्ञ, संशोधक आणि कुलगुरूंनी डाळिंब शेतीच्या शाश्वत विकासाचा आराखडा मांडला. सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सहयोगाने सोसायटी फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ पोमग्रेनेट रिसर्च (सार्प), सोलापूर यांच्यावतीने येथील यशदा येथे तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. या परिषदेत देशभरासह दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, स्पेन आदी आठ देशांतील शेतकरी, शास्त्रज्ञ आणि संशोधक सहभागी झाले आहेत. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर डाळिंब शेती, रोपनिर्मिती, किडी-रोगांचे निर्मूलन, जलव्यवस्थापन यांसह विविध विषयांवर तांत्रिक सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

'क्लीन प्लॅन्ट प्रोग्राम' आणि मान्यताप्राप्त रोपवाटिकांमधूनच प्रमाणित (जी-४ दर्जाची) रोपांची लागवड करा. केवळ एकाच वाणावर अवलंबून



न राहता 'सोलापूर लाल', 'शरद किंग' यांसारख्या नवीन वाणांचा स्वीकार करा.ठिबक, 'फर्टिगेशन', गादीवाफा, ओलावा मोजण्यासाठी एआय टूल्सचा वापर करा. फळे तडकणे व सनबर्न रोखण्यासाठी पाण्याचे नियोजन, शेडनेट आणि योग्य बहाराची निवड करा. डाळिंबावरील रोग व किडींच्या अचूक निदानासाठी एनआरसीपीने विकसित केलेल्या 'अनार रक्षक' मोबाइल ॲपचा वापर करा, असे मुद्दे येथे मांडण्यात आले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे म्हणाले, ''भारतात डाळिंबाचे सर्वाधिक उत्पादन होत असले तरी ९९ टक्के क्षेत्रात एकाच 'भगवा' वाणाची लागवड असल्याने रोगांचा प्रसार वेगाने होतो. यावर मात करण्यासाठी एनआरसीपीने 'सोलापूर लाल', 'शरद किंग' आणि प्रक्रियेसाठी 'सोलापूर अनारदाना' हे नवीन वाण विकसित केले आहेत. उत्पादकता ६.८० वरून १२ टनांपर्यंत वाढली असून, आगामी काळात प्रति हेक्टरी ३० टन उत्पादकतेचे उद्दिष्ट आहे.'' आयसीएआरचे अतिरिक्त महासंचालक डॉ. व्ही. बी. पटेल यांनी सांगितले, ''केंद्र सरकारने १७६७ कोटी रुपयांच्या निधीसह 'क्लीन प्लॅन्ट प्रोग्राम' सुरू केला असून, एनआरसीपी सोलापूर येथे डाळिंबाचे केंद्र उभारले आहे. यातून जी-४ दर्जाची प्रमाणित, विषमुक्त रोपे शेतकऱ्यांना मिळतील. यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी होऊन निर्यातीला गती मिळेल.'' माजी फलोत्पादन आयुक्त डॉ. बी. एन. एस. मूर्ती म्हणाले, ''तापमानवाढ आणि अनिश्चित पावसामुळे डाळिंब फळे तडकणे व उन्हामुळे डाग पडण्याचे प्रमाण २५ ते २७ टक्क्यांनी वाढले आहे. यासाठी योग्य बहाराची निवड, छाटणीनंतर विश्रांती आणि जमिनीच्या आरोग्यानुसार खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.''

भारतीय डाळिंब शेतीचे यश, क्षमता आणि भविष्यातील संधी यावरील सत्र महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. खर्चे म्हणाले, ''प्रत्येक प्रदेशातील डाळिंब शेतीच्या समस्या भिन्न आहेत. त्यामुळे 'सर्वदूर एकच उपाय' न वापरता प्रदेशनिहाय तंत्रज्ञान विकसित करावे लागेल. तेलकट डाग, मर रोगाच्या निदानासाठी 'स्पीड ब्रीडिंग' व जनुकीय चाचण्यांचा वापर वाढवणे गरजेचे आहे. तसेच, जमिनीतील ओलावा व कॅनोपी व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व अचूक शेतीचा अवलंब करावा लागेल. मर रोगाची साखळी तोडण्यासाठी मान्यताप्राप्त रोपवाटिकांची निर्मिती, हवामान सक्षम 'रूटस्टॉक'चा शोध, सर्व संस्थांचा सहभाग यांवर काम करावे लागेल.''




### महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

# जिल्ह्यात हेल्मेट सक्तीचा धडाका; ४,७३४ दुचाकीस्वारांवर कारवाई

लातूर। प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत असलेले रस्ते अपघात आणि अपघातांमध्ये होणारी जीवितहानी रोखण्यासाठी लातूर पोलीस विभागाने १ सप्टेंबर २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात हेल्मेट सक्तीची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेत हेल्मेट न वापरणाऱ्या ४ हजार ७३४ दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील रस्ते अपघातांमध्ये दुचाकीस्वारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, अपघाताच्या वेळी डोक्याला गंभीर दुखापत होऊन अनेकदा जीवितहानी होत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे नागरिकांनी दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करावा आणि स्वतःचा जीव सुरक्षित ठेवावा, या प्रमुख उद्देशाने लातूर पोलिसांनी हेल्मेट सक्तीचा निर्णय घेतला आहे.



लातूर पोलिसांकडून हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गांवर हेल्मेट वापराबाबत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण २३ पोलीस ठाणी तसेच वाहतूक नियंत्रण शाखेच्या माध्यमातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, यासाठी पोलिसांकडून ठिकठिकाणी तपासणी करण्यात येत आहे. हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांना थांबवून त्यांना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात येत आहे. त्याचबरोबर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जात आहे.लातूर पोलिसांनी या मोहिमेमागील भूमिका स्पष्ट केली असून, हेल्मेट सक्तीचा उद्देश दंड वसूल करणे नसून अपघातांमध्ये होणारी जीवितहानी रोखणे हा आहे. हेल्मेट हे वाहतूक पोलिसांच्या कारवाईपासून वाचण्यासाठी नव्हे, तर अपघाताच्या वेळी दुचाकीस्वाराच्या डोक्याचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा कवच आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाईसाठी पोलीस तैनात आहेत, त्या ठिकाणी नागरिकांना तातडीने हेल्मेट उपलब्ध व्हावे, यासाठी हेल्मेट विक्रेत्यांनाही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एखाद्या नागरिकाने जागेवरच हेल्मेट खरेदी करून ते परिधान केले, तर अशा नागरिकाला दंड न करता हेल्मेट वापरण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. लातूर जिल्ह्यात हेल्मेट वापरण्याचे प्रमाण अत्यल्प होते. मात्र, १ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद मिळू लागला असून, पहिल्याच आठवड्यात हेल्मेट वापरण्याचे प्रमाण सुमारे १० ते १५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. हेल्मेट वापराबाबत नागरिकांमध्ये हळूहळू जागरूकता निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पोलिसांकडून करण्यात येत असलेल्या कारवाईसोबतच नागरिकांना हेल्मेट वापरण्याचे फायदे समजावून सांगण्यात येत आहेत. त्यामुळे ही मोहीम केवळ दंडात्मक स्वरूपाची न ठेवता जनजागृती आणि सुरक्षित वाहतूक संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. लातूर पोलिसांनी हेल्मेट सक्तीबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले आहे की, जिल्ह्यातील सर्व नागरिकांकडून शंभर टक्के हेल्मेटचा वापर सुरू होईपर्यंत ही कारवाई सातत्याने सुरू राहणार आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांनी पोलिसांच्या कारवाईची वाट न पाहता स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा नियमित वापर करावा. दुचाकीवर प्रवास करताना हेल्मेटचा वापर केल्याने अपघाताच्या प्रसंगी डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतीचा धोका कमी करण्यास मदत होते. त्यामुळे हेल्मेटचा वापर हा केवळ वाहतुकीचा नियम नसून स्वतःच्या जीवनाची आणि कुटुंबाच्या भवितव्याची जबाबदारी आहे. लातूर पोलीस विभागाने जिल्ह्यातील सर्व दुचाकीस्वारांना या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आवाहन केले आहे. ''हेल्मेट घाला, सुरक्षित राहा आणि आपल्या कुटुंबाची चिंता दूर करा,'' या भावनेतून प्रत्येक दुचाकीस्वाराने स्वतःहून हेल्मेटचा वापर करण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यात अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेला नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास निश्चितच सुरक्षित वाहतुकीच्या दिशेने मोठे पाऊल पडणार आहे. त्यामुळे हेल्मेट सक्ती ही पोलिसांची मोहीम न राहता प्रत्येक नागरिकाची सुरक्षिततेची चळवळ बनावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आत्मशुद्धी, कर्मनिर्जरा, तप-त्याग आणि क्षमाभावाचा संदेश

### आठ दिवस विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन



जालना। प्रतिनिधी

जैन धर्मातील पर्वाधिराज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र पर्युषण पर्वाला जालना शहरात ८ सप्टेंबरपासून भक्तिभावपूर्ण वातावरणात मंगलमय सुरुवात झाली. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने गणेश नगर येथील 'पावन तपोधाम' येथे पर्युषण पर्वानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्वेतांबर जैन परंपरेत पर्युषण पर्व आठ दिवसांचे असून यंदा ८ ते १५ सप्टेंबरदरम्यान हे पर्व साजरे होत आहे.पर्युषण पर्वाच्या पहिल्याच दिवशी सकाळी अंतगड सूत्रवाचन व प्रवचनाला सुरुवात झाली. यावेळी उपस्थित श्रावक-श्राविकांना पर्युषण पर्वाचे आध्यात्मिक महत्त्व, आत्मशुद्धी, कर्मनिर्जरा, तप, त्याग, संयम, क्षमा आणि मैत्री याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रवचनात सांगण्यात आले की, पर्युषण हा केवळ धार्मिक उत्सव नसून स्वतःकडे पाहण्याचा, आत्मपरीक्षण करण्याचा आणि जीवनातील दोष दूर करण्याचा काळ आहे. 'परि' आणि 'उपवस' या संकल्पनेतून पर्युषणाचा अर्थ स्पष्ट करताना चारही बाजूंनी आत्म्याच्या जवळ राहणे, आत्म्याला तपविणे, दुर्गुणांचे विसर्जन करणे, सद्गुणांचे अर्जन करणे आणि कर्मांची निर्जरा करणे, असा त्याचा आध्यात्मिक अर्थ सांगण्यात आला या आठ दिवसांत मनुष्याने बाह्य दिखाव्यापेक्षा अंतर्मुख होऊन क्रोध, मान, माया, लोभ, राग-द्वेष, अहंकार यांसारख्या अंतर्गत विकारांवर विजय मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करण्यात आले. पर्युषण पर्व हे कर्मनिर्जरेचे पर्व असल्याचे स्पष्ट करताना प्रवचनात सांगण्यात आले की, मनुष्याच्या जीवनात कर्मांचा मोठा प्रभाव असतो. तप, त्याग, संयम, ब्रह्मचर्य, दान, भावना आणि स्वाध्यायाच्या माध्यमातून कर्मांचे बंधन कमी करण्याचा प्रयत्न या पर्वात केला जातो. 'पर्युषण म्हणजे केवळ उपवास नव्हे, तर मनातील विकारांचा उपवास आहे,' असा भावार्थ यावेळी स्पष्ट करण्यात आला. शरीराला उपवासाने शुद्ध करण्याबरोबरच विचार, वाणी आणि आचरणाची शुद्धता साधणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.क्षमा आणि मैत्री हीच अंतर्गत शत्रूंवर विजयाची शस्त्रे पर्युषण पर्वाकडे एका आध्यात्मिक युद्धाप्रमाणे पाहण्याचे आवाहन करताना मनुष्याने बाहेरील शत्रूंपेक्षा स्वतःच्या मनातील राग, द्वेष, अहंकार व मोह यांच्यावर विजय मिळवावा, असे सांगण्यात आले. या अंतर्गत संघर्षासाठी 'क्षमा आणि मैत्री' ही दोन प्रभावी शस्त्रे आहेत, असे प्रवचनात नमूद करण्यात आले. दुसऱ्याने केलेल्या चुकीचा राग मनात न ठेवता क्षमा करणे आणि सर्व जीवांशी मैत्रीभाव ठेवणे, हेच पर्युषण पर्वाचे खरे सार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अंतगड सूत्रातून त्याग आणि तपस्येची प्रेरणा : पर्युषण पर्वाच्या आठही दिवसांत अंतगड सूत्रवाचन करण्यामागील आध्यात्मिक उद्देशही स्पष्ट करण्यात आला. या सूत्रामध्ये उल्लेख असलेल्या महान साधू-साध्वी, श्रावक-श्राविका आणि धर्मनिष्ठ व्यक्तींच्या जीवनातील त्याग, तपस्या, सहनशीलता, संयम आणि क्षमाभावातून प्रेरणा घेऊन स्वतःच्या जीवनात परिवर्तन घडवून आणावे, असा संदेश देण्यात आला. अंतगड सूत्र हे केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यातील विचारांचे श्रवण, मनन, चिंतन आणि आचरण करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. आगमवाणीचे महत्त्व विशद : प्रवचनात जैन आगमांचे स्वरूपही समजावून सांगण्यात आले. सूत्रागम, अर्थागम, तदुभयागम, आत्मागम, अनंतरागम आणि परंपरागम अशा विविध स्वरूपांत ज्ञानपरंपरा पुढे आली असल्याचे सांगण्यात आले. तीर्थंकरांच्या सर्वज्ञ ज्ञानातून प्रकट झालेली वाणी, गणधरांमार्फत पुढे आलेली ज्ञानपरंपरा आणि गुरु-शिष्य परंपरेतून जतन झालेली आगमवाणी यांचे महत्त्व विशद करण्यात आले. श्रद्धा आणि जिज्ञासा यांच्या माध्यमातून ज्ञान ग्रहण करून त्याचे आत्मचिंतन करणे आवश्यक आहे, असेही सांगण्यात आले.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून २ हजार शाळांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक प्रार्थना गीत

जालना। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये मानवता, संवेदनशीलता, परस्पर प्रेम, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि चांगले संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील शाळांमध्ये 'हीच आमुची प्रार्थना अन्? हेच अमुचे मागणे' हे प्रार्थना गीत नियमितपणे गायिले जात आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील २ हजार ३६१शाळांमधील ३ लाख ४६ हजार ३४० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. जिल्ह्यात जिल्हा परिषद, नगरपालिका तसेच विविध व्यवस्थापनांच्या एकूण २ हजार ४४४ शाळा आहेत. त्यापैकी २ हजार ३६१ शाळांमध्ये हे प्रार्थना गीत विद्यार्थ्यांकडून सामूहिकरित्या गायिले जात आहे. जिल्ह्यातील एकूण विद्यार्थी



संख्या ३ लाख ७६ हजार २९४ असून, त्यापैकी सुमारे ९२ टक्के विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमाचा संदेश पोहोचला आहे.

'हीच आमुची प्रार्थना अन्? हेच अमुचे मागणे' या गीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात माणुसकी, बंधुभाव, प्रेम, सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शालेय जीवनात मिळालेले संस्कार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने पुस्तकी ज्ञानासोबतच मूल्याधारित आणि संस्कारक्षम शिक्षण देण्यावर भर देण्यात येत आहे. दररोज सकाळी शाळेच्या प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांकडून हे गीत सामूहिकरित्या गायिले जाते.

त्यामुळे शालेय वातावरणात सकारात्मकता निर्माण होण्यास मदत होत असून, गीतातील मानवतावादी विचार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी शिक्षकांकडूनही विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांनी एकमेकांना मदत करणे, गरजू मित्रांना सहकार्य करणे, स्वच्छता राखणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे, निसर्गाची काळजी घेणे तसेच समाजातील सर्व घटकांशी प्रेमाने व आदराने वागणे, या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांपर्यंतही हा उपक्रम प्रभावीपणे पोहोचविण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, उत्तम संस्कार आणि सामाजिक जाणीव देण्यासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगिता भागवत यांनी सांगितले. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात यांनीही या उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाची माहिती दिली.

## समृद्धी व घृष्णेश्वरकडून प्रतिटन १०० रुपयांचा वाढीव हप्ता

जालना। प्रतिनिधी

शेतकरी बांधवांचा सर्वांत महत्त्वाचा सण असलेल्या बैलपोळ्यानिमित्त 'समृद्धी व घृष्णेश्वर साखर कारखान्या'च्या वतीने शेतकरी बांधवांच्या खात्यात प्रतिमेट्रिक टन १०० रुपयांचा वाढीव हप्ता वर्ग करण्यात आला आहे. तसेच आगामी दिवाळी सणाला गाळप हंगाम २०२५-२६ च्या अंतिम हप्त्याची घोषणा कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयानंतर करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी दिली आहे.



गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये समृद्धी व घृष्णेश्वर साखर कारखान्यात गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसासाठी पहिला हप्ता प्रतिमेट्रिक टन २,८०० रुपये याप्रमाणे देण्यात आला. त्यानंतर बैलपोळ्यानिमित्त शेतकऱ्यांना प्रतिमेट्रिक टन १०० रुपयांचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने घेतला. सदर रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. सध्या आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना संकटाच्या काळात वाढीव हप्ता मिळाल्याने शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. वाढीव हप्ता थेट खात्यात जमा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील, व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी तसेच सर्व संचालक मंडळाचे आभार मानले.

**दिवाळी जाहीर करणार अंतिम भाव- सतीश घाटगे** : गाळप हंगाम २०२५-२६ मधील उसाचा हा अंतिम भाव नसून, शेतकऱ्यांच्या उसाचा अंतिम भाव दिवाळी सणाला जाहीर करण्यात येणार असल्याचे सतीश घाटगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

**बैलपोळा सणासाठी शेतकऱ्यांना साखरेचे वाटप :** शेतकऱ्यांना अल्पदरात साखरेचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ पासून साखर वाटप सुरू होणार असून, सर्व सभासद शेतकऱ्यांनी सवलतीच्या दरातील साखरेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शेतकी विभागाने केले आहे.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री पी.एस. घोडके, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४७७/२०२६**

**उषा विरूध्द निरंक**

अर्जदार :- १) उषा भ्र. राजू ससाणे वय ७८ वर्ष, धंदा घरकाम रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि.बीड. २) सवित्ता भ्र. सचिन ससाणे वय ४० वर्ष, धंदा घरकाम रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि. बीड. ३) सृष्टी पि. सचिन ससाणे वय १९ वर्ष, धंदा शिक्षण, रा. भिम नगर, रांजणी, ता. गेवराई जि. बीड. ह.मु. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि.बीड. ४) सिध्दार्थ पि. सचिन ससाणे वय १७ वर्ष, धंदा शिक्षण, रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता. जि. बीड. अर्जदार ४ करीता अ.पा.क. अर्जदार क्र. २

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत, वरील अर्जदार यांनी या न्यायालयात सचिन पि. राजु ससाणे रा. भिमनगर रांजणी, ता. गेवराई, जि. बीड व मृत्यूसमयी चा पत्ता बीड, ता.जि. बीड यांचा मृत्यु सिध्दीविनायक नेत्रालय बीड ता. जि. बीड येथे झाला आहे. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत सचिन पि. राजु ससाणे यांचा मृत्यु दिनांक २१.०७.२०२६ रोजी झाला आहे. वरील अर्जदार १ ते ४ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सचिन पि. राजु ससाणे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार १ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार १ ते ४ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सचिन पि. राजु ससाणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक ०७.०९.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९.१०.२०२६ आहे.

स्वाक्षरीत /-
क. लिपीक

आदेशावरून,
स्वाक्षरीत /-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.



### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३४०/२०२६**

**नाना व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत :- ॲड. एस. आर. नागरगोजे**

अर्जदार :- १. नाना फुलाजी सुळे, रा. निवडुंगा ता. पाटोदा जि. बीड २. आजिनाथ नाना उर्फ नानाभाउ सुळे, रा. निवडुंगा ता. पाटोदा जि. बीड ३. अनिता बापु तनपुरे, रा. शिउर ता. जामखेड जि. अहमदनगर ४. मंदाबाई बबन पाचपुते, रा. खकाळवाडी ता. आष्टी जि. बीड ५. संगिता परमेश्वर खरपाडे, रा. खालापुरी ता. शिरुर का. जि. बीड

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत वच्छला उर्फ वत्सलाबाई नाना सुळे हया रा. मौजे निवडुंगा ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी वच्छला उर्फ वत्सलाबाई नाना सुळे, यांचा मृत्यु दिनांक ०३/०२/२०१७ रोजी मौजे निवडुंगा ता. पाटोदा जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ हे मयताचे पती असून अर्जदार नं २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ते ५ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत वच्छला उर्फ वत्सलाबाई नाना सुळे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ ऑक्टोबर २०२६.

स्वाक्षरीत /-
क.लिपीक

आदेशावरुन,
स्वाक्षरीत/-
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.



### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३३६/२०२६**

**जमुनाबाई व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत :- ॲड. व्ही. व्ही. कदम**

अर्जदार : १. जमुनाबाई भिमराव सोंडगे, रा. गवळवाडी, ता. पाटोदा जि. बीड २. तारा सोमनाथ उर्फ सोमीनाथ सोंडगे, रा. गवळवाडी, ता. पाटोदा जि. बीड ३. सार्थक सोमनाथ उर्फ सोमीनाथ सोंडगे, रा. गवळवाडी, ता. पाटोदा जि. बीड ४. दिपक सोमनाथ उर्फ सोमीनाथ सोंडगे, रा. गवळवाडी, ता. पाटोदा जि. बीड ५. वैष्णवी अंकुश टेकाळे, रा. येवलवाडी ता. पाटोदा जि. बीड

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सोमनाथ उर्फ सोमीनाथ भिमराव सोंडगे, हे रा. मौजे गवळवाडी ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी सोमनाथ उर्फ सोमीनाथ भिमराव सोंडगे, यांचा मृत्यु दिनांक १०/०८/२०२६ रोजी रामेश्वर हॉस्पीटल जामखेड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सोमनाथ उर्फ सोमीनाथ भिमराव सोंडगे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १२ ऑक्टोबर २०२६.

स्वाक्षरीत /-
क.लिपीक

आदेशावरुन,
स्वाक्षरीत/-
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.


## धनगर समाजाच्या आरक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



जालना। प्रतिनिधी

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाज बांधवांच्या वतीने आज सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी, जालना यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. धनगर समाजाचे नेते तथा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या आवाहनानुसार राज्यभरातील जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयांसमोर आंदोलन करून शासनाला निवेदन देण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून जालना येथेही धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले.

धनगर समाजाचा आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असून, समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणात राज्य शासनाने धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाजूने स्पष्ट व ठाम भूमिका पूर्ण कायदेशीर ताकदीने मांडावी, तसेच भविष्यातील परिस्थिती लक्षात घेऊन पर्यायी 'प्लॅन-बी' तयार ठेवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाने आवश्यक समन्वय साधून सर्व कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा समाज बांधवांनी व्यक्त केली. यावेळी ''येळकोट येळकोट, जय मल्हार'' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. शासनाने या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास आगामी काळात तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही धनगर समाज बांधवांनी दिला. या प्रसंगी बाबा आटोळे, शिवप्रकाश चितळकर, नितीन कानडे, कृष्णा गायके, सोपानराव आटोळे, गोविंद मदनूरे, दिगंबर सातपुते, मनोज मदनूरे, ॲड. मारोती आटोळे, अक्षय आटोळे यांची उपस्थिती होती.

# नरेगाच्या कुशल कामांचे पैसे तात्काळ द्या

## शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची सरकारकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा/जी-रामजी) अंतर्गत पूर्ण झालेल्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कुशल कामांची बिले ऑनलाइन झाल्यानंतरही त्यांची पेमेंट प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात येत असल्याने आता शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मंजूर, पूर्ण आणि ऑनलाइन बिले झालेल्या कामांची देयके कोणत्याही दबावाखाली रोखू नयेत; पारदर्शक नियमांनुसार तातडीने पेमेंट करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केली आहे.

नरेगा अंतर्गत ग्रामीण भागात गायगोठे, विहिरी, फळबाग लागवड, नाफेड अंतर्गत विविध कामे, सिमेंट रस्ते, खडीकरण यांसह अनेक वैयक्तिक व सार्वजनिक विकासकामे केली जातात. या कामांमधून ग्रामीण भागातील लाभार्थी, मजूर तसेच विविध यंत्रणांना आर्थिक आधार मिळतो. मात्र, कामे पूर्ण करून त्यांची कुशल बिले ऑनलाइन झाल्यानंतरही देयके प्रलंबित राहिल्याने संबंधित लाभार्थी व कामाशी निगडित घटक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही पेमेंट थांबविण्याचे कारण काय?, असा सवाल उपस्थित करत जिल्हाप्रमुख जगताप यांनी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजनांचा उद्देश केवळ कागदोपत्री

◀◀ पान ३ वर

### दोन वर्षापासून बिले प्रलंबित

नरेगाच्या कुशल कामाची बिले सन २०२४- २५ व २०२५- २६ या दोन वर्षापासून बिले प्रलंबित असून ग्रामीण भागातील काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते यामुळे अडचणी सापडले आहेत. अनेकांनी उसनवारी करून ही कामे पूर्ण केली. मात्र सरकार पैसे देत नसल्याने ग्रामीण भागातील कार्यकर्ते अडचणीत आले आहेत. पैसे मिळाले नाही तर अनेकांनी मंत्रालयासमोर आत्महत्या करण्याची तयारीही दर्शवली आहे.



### बजेट नसल्याचे कारण दाखवतात

बिला संदर्भात विचारणा केली तर सरकारकडे बजेट आले नाही. असे कारण दाखवले जाते. दोन वर्षे झाले तरी सरकारकडे पैसे येत नाहीत याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात असून नरेगाला सरकारकडे पैसे नाहीत. मात्र जी- रामजी योजनेसाठी सरकारकडे पैसे आहेत असे बोलले जाते. जी- रामजी ही योजना मार्चनंतर सुरू झाली त्याला द्यायला सरकारकडे पैसे आहेत. मात्र जुनी कामे पूर्ण झालेली असूनही त्याची बिले द्यायला सरकारकडे पैसे नाहीत हा सरकारचा अजब कारभार दिसत आहे.

### सरकारला कार्यकर्ते भिकाला लावायचे आहेत काय?

गेल्या दोन वर्षापासून नरेगाचे पैसे दिले जात नाहीत. अनेकजण यामुळे अडचणी झाले आहेत. जर पैसे मिळाले नाही तर अनेक जण भिकाला लागतील आणि अनेकांना आपली प्रॉपर्टी विकण्याची वेळ येईल. सरकारला नेमके काय करायचे आहे? कार्यकर्ते भिकाला लावायचे आहेत काय असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होतो.

# मांजरसुंबा येथील हॉटेल विराज बार वरील जुगार अड्ड्यावर धाड; ७२ लाख ८६ हजारांचा मुद्देमालासह १९ जुगारी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने मांजरसुंबा येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून तब्बल १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रकमेसह मोबाईल, वाहने व इतर साहित्य असा एकूण ७२ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मांजरसुंबा येथील विराज बिअर बारच्या वरच्या मजल्यावर असलेल्या ऋतुराज सांस्कृतिक व क्रीडा मंडळावर पोलिसांनी कारवाई केली. सदर क्रीडा मंडळाला शासनाकडून परवाना देण्यात आलेला असून, परवान्यातील अटींनुसार तेथे कोणत्याही प्रकारचा जुगार खेळण्यास मनाई आहे. मात्र, पोलिसांच्या तपासणीत या ठिकाणी जुगार सुरू असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले.

कारवाईदरम्यान क्लबमध्ये पत्ते खेळण्यासाठी टेबल-खुर्च्यांची व्यवस्था, पत्त्यांचे कॅट, विविध रंगांचे टोकन, सभासद ओळखपत्रे तसेच उपस्थितीच्या नोंदी आढळून आल्या. उपस्थित व्यक्तींच्या अंगझडतीमध्ये ५५ हजार ६०० रुपये रोख, मोबाईल फोन, वाहने आणि अन्य साहित्य असा एकूण ७२ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या कारवाईत विलास ज्ञानोबा नाईकवाडे, राम बारीकराव बहिरवाळ, अशोक भालचंद्र वेदपाठक, राहुल सुखाहारी गदळे, उत्तरेश्वर किसन खिंडकर, शेख अशोक शेख रफीक, सज्जाद खान शफीक खान पठाण, राजेंद्र नारायण जाधव, भरत बलभीमराव काळुंके, संतोष जालींदर चादर, मेघराज योगीराज ढोकणे, महादेव नारायण शिंदे, कानिफनाथ गणेश हुंबे, शेख समी शेख नईम, संदीप पिलाजी गोरे,

◀◀ पान ३ वर

# गोदावरी नदीपात्रात एलसीबीचा पहाटे छापा

## बेकायदेशीर वाळू उपसा करणारे ४ जण गजाआड, ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई / बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणाऱ्या वाळूमाफियांवर स्थानिक गुन्हे शाखेने पहाटेच्या सुमारास मोठी कारवाई केली आहे. मौजे सुरळेगाव शिवारातील नदीपात्रात छापा टाकून पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चार ट्रॅक्टर व लोखंडी केन्या असा एकूण ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



स्थानिक गुन्हे शाखा, बीडचे पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गेवराई उपविभागात गस्त घालत होते. या दरम्यान गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सुरळेगाव येथे गोदावरी नदीपात्रात काही व्यक्ती आर्थिक फायद्यासाठी, विनापरवाना ट्रॅक्टरला लोखंडी केन्या लावून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वाळू उपसा करत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सुरळेगाव शिवारातील नदीपात्रात जाऊन पाहणी केली असता, प्रत्यक्ष वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तातडीने छापा टाकून चारही संशयितांना रंगेहात पकडले. सोमनाथ शिवाजी मोरे (वय २७, रा. सुरळेगाव, ता. गेवराई) आदेश ज्ञानेश्वर भंडारे (वय २१, रा. सुरळेगाव, ता. गेवराई) सचिन भाऊराव लिंबोरे (वय २४,

◀◀ पान ३ वर

# शुक्रवारी उपविभागीय कार्यालयावर मोर्चा ; विविध मागण्यांसाठी प्रशासनाचे वेधणार लक्ष !

पाटोदा । प्रतिनिधी

नाळवंडी येथील अल्पवयीन चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या गंभीर घटनेच्या निषेधार्थ तसेच पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी पाटोदा येथे भव्य मूक आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी उपविभागीय कार्यालय, पाटोदा येथे हा मोर्चा काढण्यात येणार आहे. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, पीडित चिमुकलीला न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटनांना आळा बसावा, या मागणीसाठी हा मूक आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. शांततेच्या मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासनाचे लक्ष या गंभीर प्रकरणाकडे वेधण्याचा आयोजकांचा उद्देश आहे.



मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रकरणाचा तपास निष्पक्ष व कालमर्यादेत पूर्ण करून खटला जलदगतीने चालविणे, दोष सिद्ध झाल्यास आरोपीला कायद्यानुसार कठोरात कठोर कमाल शिक्षा मिळावी, तसेच या गंभीर प्रकरणासाठी विशेष सरकारी अभियोक्त्याची तात्काळ नियुक्ती करावी, यांचा समावेश आहे. पीडित कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत, आवश्यक पोलीस संरक्षण, कायदेशीर सहाय्य व पुनर्वसनाचा लाभ तातडीने देण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच आरोपी किंवा संबंधित व्यक्तींनी शासकीय अथवा खासगी जागेवर अतिक्रमण केले असल्यास महसूल विभागामार्फत चौकशी व मोजणी करून अतिक्रमण आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी

◀◀ पान ३ वर

# माजलगाव धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय तात्काळ स्थगित करा -जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यापूर्वी शासनाने २२ पुनर्वसित गावांतील शेतकरी आणि नागरिकांच्या भवितव्याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांनी यापूर्वीच धरणासाठी आपल्या जमिनी, घरे आणि गावांचा त्याग करून पुनर्वसनाचा त्रास सहन केला आहे. आता पुन्हा त्यांच्या जमिनी बुडीत क्षेत्रात जाणार असतील, तर हा शेतकऱ्यांवर होणारा अन्याय आहे.



धरणाची उंची वाढवण्यापूर्वी बुडीत क्षेत्राचा अधिकृत नकाशा, बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या, भूसंपादन, नुकसानभरपाई आणि पुनर्वसनाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी. तसेच संबंधित २२ गावांतील शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये.

पाणीसाठा वाढवण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याऐवजी धरणातील गाळ काढणे, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे यांसारख्या पर्यायी उपायांचा शासनाने विचार करावा. साळींबा योजनेला माझा पूर्ण पाठिंबा आहे परंतु या

◀◀ पान ३ वर

# बीड व धाराशिव जिल्ह्यात हैदोस घालणाऱ्या सराईत टोळीवर ‘मिनी मोक्का’

बीड । प्रतिनिधी

बीड आणि शेजारील धाराशिव जिल्ह्यात शस्त्रांचा धाक दाखवून चोऱ्या, घरफोड्या व दरोडे टाकून धुमाकूळ घालणाऱ्या एका आंतरजिल्हा संघटित गुन्हेगार टोळीविरुद्ध बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी कठोर पाऊल उचलले आहे. या टोळीवर नवीन भारतीय न्याय संहितेनुसार संघटित गुन्हेगारीविरोधातील कलम १११ (मिनी मोक्का) लावण्यास पोलीस अधीक्षकांनी मंजुरी दिली आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी जगतात मोठी खळबळ उडाली आहे.

येळंबघाट येथे झाली होती ६ लाखांची घरफोडी

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ५ जुलै २०२६ रोजी रात्री येळंबघाट (ता. जि. बीड) येथे अज्ञात चोरट्यांनी रमेश बाबासाहेब काळे यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला होता. घरातून सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा एकूण ६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २७६/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी तपास चक्रे वेगाने फिरवून या गुन्ह्यात एकूण ६ आरोपी निष्पन्न केले. त्यापैकी धाराशिव जिल्ह्यातील कळंब परिसरातील ४ आरोपींना पोलिसांनी सापळा रचून जेरबंद केले.

अटक आरोपींची नावे:

प्रकाश ऊर्फ गुड्या शाहाजी काळे (वय २२, रा. पारधी मोहा वस्ती, कळंब, जि. धाराशिव) शहाजी शेशेराव पवार (वय २५, रा. पारधी वस्ती,

◀◀ पान ३ वर

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोरगरिबांच्या मदतीला आ.धस यांच्या माध्यमातून वैद्यकीय मदतीचा हात

आष्टी । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने महागडे वैद्यकीय उपचार घेणे अडचणीचे ठरणाऱ्या आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांना मुख्यमंत्री साहायता निधीतून मोठा दिलासा मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून वैद्यकीय उपचारांसाठी चार रुग्णांना प्रत्येकी ५० हजार रुपये, अशी एकूण २ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.



यामध्ये आबासाहेब गावडे (रा. वाळुंज, ता. आष्टी), प्रभु काळे (रा. निमगाव बोडखा, ता. आष्टी), इंदु नाकाडे (रा. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) तसेच अनुजा खुरांगे (रा. धनगरवाडी, पिंपळा) यांचा समावेश आहे. या सर्व रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत मंजूर झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांना उपचाराचा आर्थिक भार काही प्रमाणात हलका होणार आहे.

गंभीर आजार किंवा मोठ्या शस्त्रक्रियांसाठी लागणारा खर्च सर्वसामान्य कुटुंबांच्या आवाक्याबाहेर असतो. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री साहायता निधी हा गरजू रुग्णांसाठी मोठा आधार ठरत आहे. आष्टी मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना या निधीचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

गरजू रुग्णांचे प्रस्ताव संबंधित यंत्रणेकडे दाखल करून त्यांना शासनाच्या वैद्यकीय मदतीचा लाभ मिळावा, यासाठी आमदार धस यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. त्यातूनच आता चार रुग्णांना एकूण दोन लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे.

या आर्थिक मदतीमुळे उपचारासाठी आवश्यक असलेल्या खर्चाची चिंता असलेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. अडचणीच्या काळात शासनाच्या मदतीचा हात मिळाल्याने लाभार्थी कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे.गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत आणि केवळ आर्थिक अडचणीमुळे कोणाचेही उपचार थांबू नयेत, यासाठी मुख्यमंत्री साहायता निधीच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांचा पाठपुरावा सुरू असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.रुग्णसेवक अमर वाळके,विकास साळवे,शरद रेडेकर यांनी आ.सुरेश धस यांच्या ऑफिस मधून रुग्णांना सहकार्य केले.

# डोंगरपट्ट्यात भुरट्या चोरांचा संचार वाढला !

## लोकवस्तीवर वास्तव करणारे लोक भयभीत, रात्रीच्या वेळी पोलिसांनी ग्रस्त वाढवावी - अँड. मयुर आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बालाघाटाच्या पर्वत रांगेत अनेक लोकवस्त्या वास्तव्यास आहेत. सध्या दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने अनेक जण आर्थिक कसठ्यात सापडले आहेत याचा फायदा भुरट्या चोरांनी घेतल्या असून डोंगरपट्ट्यात यांचा संचार वाढला असून शेतातील मोटार शेळ्या सहज जनावरे चोरीच्या घटनेत वाढ झाली असून याभागात रात्रीच्या वेळी पोलिसांनी ग्रस्त वाढवावी अशी मागणी आदर्श रुई गावचे उच्चभूषित, कर्तव्यदक्ष सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन वडवणी पोलीस स्टेशन कार्यालयाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना दिले असून याबाबत चर्चा देखील केली आहे. तर सध्या दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने प्रत्येक घटकातील लोक आर्थिक कचाट्यात सापडले आहेत. यामुळे देखील भुरट्या चोऱ्या व चोरट्यांचा या भागात सुळसुळाट व संचार देखील वाढला आहे. यामध्ये या भागातील मौजे सोन्नाखोटा फाटा ते रुईपिंपळा - खडकी या डांबरी रस्त्याचे काम सध्या चालू आहे. या रस्त्याच्या कामासाठी लोखंडी स्टेरिंग चैनल खाडेवाडीफाटा या ठिकाणी टाकण्यात आले होते. तर दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजीच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच डोंगरपट्ट्याच्या भागामध्ये लहान मोठ्या चोरीच्या घटनेमध्ये वाढ झाली असून यामध्ये पाण्याच्या तळ्यावरील व शेतातील मोटार चोरीचे प्रमाण देखील वाढले आहे. लोक वस्तीवरील वास्तव करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेळ्या व जनावरांचे चोरीचे प्रमाण वाढले आहे. यात अनेक जण पोलिसात सुद्धा तक्रार देण्यासाठी येत नाहीत. तर डोंगरपट्ट्याच्या भागामध्ये अनेक लोकवस्त्या व वाड्या येत आहेत. येथील शेकडो लोक कुटुंब घेऊन याठिकाणीच अनेक वर्षापासून वास्तव करत आहेत. सध्या चोऱ्या व चोरट्यांचे प्रमाण वाढले असल्याने हे लोक देखील भयभीत झाल्याचे दिसून येत असल्याने या भुरट्या चोऱ्या व चोरट्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. तसेच डोंगरपट्ट्या भागात रात्र आपरात्रीची पोलिसांची जास्ती प्रमाणात ग्रस्ती वाढवण्यात यावी. अशी मागणी आदर्श रुई गावचे उच्चभूषित, कार्यक्षम सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांनी केली आहे.



# पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देवू म्हणणाऱ्या भाजपने धनगर समाजाला फसवलं- दिपक बोऱ्हाडे

## १७ सप्टेंबर रोजी परभणी येथे धनगर समाजाचा महामेळावा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील धनगर समाजाचे घटनात्मक एसटी आरक्षणासाठी गेल्या ७० वर्षांपासून आंदोलन सुरुच असून २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'आम्ही सत्तेत आल्यावर पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या घटनात्मक एसटी आरक्षणाचा प्रश्न सोडवू' असे आश्वासन दिले. आज जवळपास १०० पेक्षा जादा कॅबिनेट झाल्या तरी देखील धनगर समाजाच्या घटनात्मक एसटी अरक्षणाचा देवेंद्र फडवणी यांनी प्रश्न मार्गी लावला नसून भाजप सरकारने धनगर समाजाचा अपमान केला असल्याचा आरोप मल्हार योद्धे दिपक बोऱ्हाडे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत केला.



बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे परभणी येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी होत असलेल्या धनगर समाजा महामेळाव्याच्या पुर्व तयारीनिमित्त धनगर समाजाच्या व्यापक बैठकीचे आयोजन सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले होते. या बैठकीला धनगर समाजाच्या आरक्षणासाठी आहोरात्र संघर्ष करणारे दिपक बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पत्रकार परिषदेत बोराडे यांनी मुख्यमंत्री व सरकारवर संताप व्यक्त केला.एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्या पायापाशी सर्व मंत्रीमंडळ, प्रशासन शिव्या खावून ठाण मांडून बसत आहे आणि आम्ही दारात उभा असताना देखील आमची कोणी दखल घेणार नसेल तर धनगर भोळा आहे मात्र त्याला तिसरा डोळा आहे. आम्हाला भाजपने आश्वासन दिले त्यामुळे आम्ही २०२९ पर्यंत भाजपला आरक्षण मागू आणि आरक्षणाची अंमलबजाणी लवकर नाही झाली तर धनगरी हिसका दाखवू अशा शब्दात बोऱ्हाडे यांनी फडणवीस यांच्यावर संताप व्यक्त केला. मोदी, फडणवीसांच्या मानगुटीवर बसल्याशिवाय त्यांना जाग येणार नाही. पंढरपुर, जालना व मुंबई येथील आंदोलनातील दिलेल्या एकाही आश्वासनांची फडवीसांनी पुर्तता केली नाही. फडणवीसांची दुटप्पी भूमिका धनगर समाजाच्या लक्षात येत आहे. जर फडवीसाला शिव्यांची भाषा कळत असेल तर आम्ही धनगर आहोत याची जाणीव फडवीसांना येणाऱ्या काळात होईल. परभणी येथे धनगर समाजाचा महामेळावा होणार आहे. या मेळाव्याला देशभरातील धनगर समाज उपस्थित राहणार असून आरक्षण लढ्याची पुढील दिशा ठरवली जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील धनगर समाजाने परभणी येथील महामेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले. यावेळी बैठकीला बीड जिल्ह्यातील सकल धनगर समाजाचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २०२९ पर्यंत आरक्षण लढा लढणार

धनगर समाजला एसटी प्रवर्गाचे घटनात्मक आरक्षण पहिल्या कॅबिनेटमध्ये देवू असे आश्वासन फडणवीस यांनी दिले मात्र त्यांनी धनगर समाजाचा मोठा अपमान केला आहे. आपल्याला फक्त भाजपलाच आरक्षण मागण्याचा अधिकार आहे, विरोधी पक्षांनी आपल्याला आश्वासन दिलेलेच नाही २०२९ च्या नंतर भाजप सत्तेत राहिल की नाही हे सांगता येत नाही, त्यामुळे आपण फक्त २०२९ पर्यंतच आरक्षण लढा लढत राहणार असल्याची खंत दिपक बोऱ्हाडे यांनी व्यक्त केली.

### बीडमधुन हजारो बांधव परभणीला जाणार

परभणी येथे धनगर समाज घटनात्मक एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी मल्हार योद्धे दिपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या महामेळाव्याला बीड येथून हजारो समाज बांधव जाणार असून जास्तीत जास्त समाज बांधवांनी परभणीच्या महामेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन सकल धनगर समाज बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26